REFBK-0002416

# महाबळेश्वरचा प्रवास.

वा. भा. जोशी.

# महाबळेश्वरचा प्रवास.

2092

लेखक

बाळकृष्ण भाऊ जोशी.

पुणें येथें
'आर्यभूषण' छापखान्यात अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें
व बाळकृष्ण भाऊ जोशी यांनीं पुणें येथें
प्रसिद्ध केलें.

REFBK-0002416
REFBK-0002416

सन १९२३.

किंमत ४ आणे.

२५७३१

# महाबळेश्वरचा प्रवास.

रमणीय वनश्री पाहून ज्याच्या मनास आल्हाद वाटत नाहीं, व ज्याच्या हृदयवृत्ति उचंबळून येत नाहींत, असा मनुष्य विद्वान् व सुसंस्कृत मंडळींत अगदींच क्वचित् असेल; किंबहुना नसेलच असें मला वाटतें. सृष्टिदेवीची उपासना करीत राहून, तिच्या हृदयाशीं हृदय मिसळून, तिजबरोबर सदोदित प्रेमानें गुजगोष्टी करीत राहणारे कवि यांचा तर सृष्टि हाच जीव ! ते अशी निसर्गसुंदर वनश्री पाहून वेडावून जाऊन, एकाद्या पिशाचाप्रमाणें, किंवा मद्यप्याप्रमाणें, किंवा एकाद्या बालाप्रमाणें म्हणा, नाचूं उडूं लागतील यांत शंकाच नाहीं ! तसेंच गूढ तत्त्वविचारांत ज्यांची बुद्धि नित्य गुंतून गेली आहे अशांनाही, आपल्या तत्त्वविचारांना अधिक तीव्र वेगानें विकसित करणारी ही वनश्री माहेरघरासारखी सुंदर आश्रयस्थान व्हावी हेंही साहजिक आहे. पण कवि आणि तत्त्वजिज्ञासु या लोकांशिवाय सर्वसाधारण लोकांनाही ही वनशोभा परम आल्हादकारक वाटते आणि त्यांनाही तिचें वारंवार दर्शन घेण्याची, किंबहुना तिचा सहवास करण्याची इच्छा होते. बाराही महिने संसाराचें जड जोखड मानेवर वागवीत असतां, ज्याची मान दुखूं लागली नाहीं व ज्याच्या खांद्याला कड आला नाहीं असा संसारवाही वृषभ कोण कोठें आहे ! अर्थात् हें जोखड थोडा वेळ तरी मानेवरून उतरावें, व एकाद्या झाडाखालीं क्षणभर मुक्त मनानें विश्रांति घेण्यास मिळावी, अशी या संसारीजनांना सुद्धां वासना असते. आणि यामुळें यांनाही रमणीय व स्वभावशुद्ध वनश्री पाहण्यास मिळाली असतां, उन्हांतून धांवणाऱ्या हरिणांना जसा दैववशात् एकादा जलसंचय सांपडावा, त्याप्रमाणें परम आनंद होतो व अशा ठिकाणीं कांहीं वेळ राहून, विश्रांतीचें खरें सुख एवढें तरी अनुभवूं या, असें त्यांना वाटल्यावांचून राहत नाहीं. सारांश, वनश्री अशी सर्वजनसुहृद् आहे. त्यामुळें आम्हांलाही फार दिवसांपासून अशी वनशोभा पाहावयाची आवड लागून राहिली होती.

याप्रमाणें वनश्री सर्वांना प्रिय खरी; पण ती सर्वांना सहजसुलभ अ मात्र नाहीं. पूर्वीसारखीं आतां अरण्यें कोठेंही राहिलीं नाहींत. ' दं देशे ' हें शब्दयुग्म पूजामंत्रांत ग्रथित केलें असल्यामुळें तो विधि प्राप्त असणाऱ्या ब्राह्मणजनांना तें पुष्कळ परिचित असतें. इतरांनाही नैमित्तिक प्रसंगीं तें उपाध्यायाकडून ऐकावयाला मिळतें. परंतु त्या अरण्यांत प्रत्यक्ष राहत असूनही त्याचें दर्शन मात्र कोणालाही मिळत नाहीं, अशी सध्यां तर सर्व महाराष्ट्राची स्थिति आहे. वस्ती अतिशय वाढली आहे, त्यामुळें दिवसेंदिवस झाडीचा नाश मोठ्या वेगानें होत आला आहे व आज झाडींचा पूर्ण अभाव होऊन दंडकारण्य एवढें नाम मात्र शेष राहिलें आहे. त्यामुळें सध्यां वनश्रीची सर्व हौस लोकांना मनांतल्या मनांतच जिरवून टाकावी लागत आहे. फार तर एकाद्या पुस्तकांत वनश्रीच्या वर्णनाच्या चार ओळी वाचाव्या व त्याच्या आधारावर आपली कल्पनाशक्ति जरा ताणून, " अहाहा ! वनश्री ! " इत्यादि प्रकारें कांहीं तरी दृष्टीपुढें आणून पाहत राहावें ! सारांश, तहान दुधाची, पण ती भागविण्याला ताक तर नाहींच, फक्त तांदळाचें धुवण मिळावें, असा हा प्रकार होतो यांत संशय नाहीं.

तर मग खरी वनश्री पाहावयाची तर काय करावें ? याचें उत्तर सर्वजण चटकन् देतील कीं—हिमालयांत जावें ! पण हिमालयांत कसें जावें हें कोण सांगेल ? अर्थात् बोलणें सोपें, पण करणें सर्वतोपरी अशक्य ! कोणाकोणाला तें शक्य झालें आहे खरें, पण सर्वसाधारण लोकांना तें कसें साधणार ? हंसांना तें शक्य झालें; परंतु त्यांच्यासारखी सर्वांना खरी सद्गुरुकृपा कशी लाभणार ? प्रो. भाटे काश्मीरास जाऊन, खुद्द नंदनवनांत जाऊन राहून आले ! परंतु तितकी सवड व तितकी लक्ष्मी यांच्या अभावामुळें, त्यांनीं लिहिलेलें प्रवासवर्णन वाचून, जेवढें मनोमय नंदनवन पाहतां येईल तेवढेंच पाहून तृप्त राहणें इतरांना भाग आहे. परंतु या सर्व प्रकारांत एक आशेला जागा आहे. ती म्हणजे **महाबळेश्वर.** हें महाबळेश्वर अगदीं आपल्याजवळ आहे. महाराष्ट्राबाहेर जाणें नको, व मोठ्या सवडीचें व खर्चाचें तद्दू अडतें म्हणून म्हणावयास नको. सह्याद्रीचें हें सर्वोच्च शिखर **सातारा** जिल्ह्यांत वांईपासून फक्त १० कोसांवर साधारणपणें मोटारच्या अर्ध्याएक तासाच्या टप्प्यावर व ३।४ रुपये भाड्यांत कोणालाही सहज पाहतां येईल असें आहे. वनश्रीच्या खऱ्या रसिकजनांवर हे या गिरिवराचे मोठे उपकार आहेत हे रसिक जनांच्या

हिमालयापर्यंत जाऊं शकणार नाहींत; मग हे आपल्या शुष्क जीविताळून न जाणों कांहीं बरेंवाईट करतील, म्हणून या आपल्या अपत्यांच्या रक्षणासाठीं जणूं काय महाराष्ट्र-भूनें हिमालयाला इकडे येऊन राहण्याला विनंति केली व त्या विनंतीला मान देऊन त्या हिमगिरीनें आपल्या सहस्र शीर्षांपैकीं एक शीर्ष येथें प्रगट करून ठेविलें ! दयार्द्र माता आपल्या लेंकरांसाठीं काय करणार नाहींत ? व आपल्या अपत्यांच्या खऱ्या कळकळीनें एकाद्या माउलीनें केलेली प्रार्थना कोण सहृदय सुज्ञ अमान्य करील ? अशी कल्पना मनांत येतांच ' स्वर्गादपि गरीयसी ' अशा या महाराष्ट्र भूमातेच्या अपत्यवात्सल्यानें हृदय भरून येतें; आणि आपला ' पृथिव्या इव मानदंडः ' हा अपार महिमा क्षणभर विसरून जो गिरिराज या एवढ्या अल्प विस्तारांत येऊन स्वतः ठाण देऊन राहिला, त्याच्या औदार्यानेंही हृदय स्तंभित होतें !

असो. अशा प्रकारचें हें महाबळेश्वराचें परम रमणीय स्थान एकदां पहावें, व हिमगिरीच्या दर्शनाचा कांहींसा आनंद एकदां तरी घ्यावा, अशी फार दिवसांपासूनची मनीषा होती. ती पुरी होण्याचा परवां योग आला, त्याची हकीकत थोडीशी येथें वाचकांना कळवावयाची आहे. प्रथम मराठी शाळेंत शिकत असतांना सातवे पुस्तकांतील **धौममहाबळेश्वर** हा धडा जेव्हां वाचला, तेव्हां या मनीषेचा उदय झाला. पुढें तो विचार अनुकूल कालाची वाट पाहत मनांत तसाच पडून होता. पुढें एकदां त्याचेंच स्मरण होऊन धौममहाबळेश्वरवर्णन हें मूळ पुस्तक वाचावेंसें वाटून तें मिळविलें. हल्लीं तें विकत मिळत नाहीं. त्यामुळें जुन्या एका वाचनालयांतून तें पुस्तक आणवून वाचलें. पण वाचनानें महाबळेश्वराच्या प्रेक्षणाची इच्छा तृप्त न होतां ती अधिकच वाढली. व कांहीं होवो; १०।२० रुपये एकदां खर्चावयाचे व महाबळेश्वर पाहून यावयाचें असें एकदां मनानें ठरविलें. नित्याच्या सहवासाला दोघे स्नेही होते. त्यांनाही हा विचार मान्य होऊन सर्वांनीं अमुक दिवशीं निघावयाचें ठरलें. तिघेही पुण्याचे राहणारे. पण मे महिन्याची सुटी त्यांतून एकदोघांना असल्यामुळें ते आपलीं कांहीं कामें उरकण्यासाठीं पुणें सोडून आपल्या इच्छित ठिकाणीं गेले तरी ठरल्या दिवशीं सायंकाळपर्यंत सर्वांनीं **वाठार स्टेशन**वर यावयाचें ठरलें होतें. व मोटारीचा खर्च व पारतंत्र्य दोन्ही टळावीं म्हणून आम्हीं सर्वांनीं आपापल्या सायकलीही बरोबर घ्यावयाचें ठरविलें. पण ठरल्या दिवशीं स्टेशनवर मी जाऊन पोंचलें

तों स्टेशनवर माझ्या दोन मित्रांपैकीं एकही नाहीं ! एवढासा प्रवास होतां होतां सत्वादं फसावयानें या माझ्या दोघां स्नेह्यांना आपला बेत आदल्या दिवशींच रहित करावा लागला ! कारण—एकजणांना ज्वर आला, त्यामुळें ते स्टेशनपर्यंत येऊन तेथून परत गेले ! दुसऱ्यांना त्यांच्या वडिलांनीं अटकाव केला ! ते त्याला म्हणाले—" तूं मूर्ख आहेस ! महाबळेश्वरला कशाला जातोस ! तूं काय कोणी मोठा साहेब आहेस हवा खायला जायला ! आपणांला हीं सोंगें कशाला ? " झालें. वडिलांनीं निषेध केल्यामुळें यांना महाबळेश्वरची आशा सोडावीच लागली. हे गृहस्थ घरचे विशेष दरिद्रीहि नव्हते. पण त्यांच्या वडिलांचें मत असें कीं, सृष्टि कसली व सौंदर्य कसलें ? ती काय रविवर्म्याची एकादी तसबीर आहे म्हणून पहात बसावयाची ? झाडांसारखीं झाडें, त्यांत काय पहावयाचें ? डोंगर तरी काय पहावयाचा ? आणि पाणी व झरे यांत तरी प्रेक्षणीय असें काय आहे ? या वृद्ध जनांचे हे असे विचार. यांना या वनश्रीची अभिरुचि कशी उत्पन्न व्हावयाची ? मोठमोठ्या कविवर्यांनीं यांजपुढें व्याख्यानें दिलीं पाहिजेत, म्हणजे रुचि उत्पन्न होईल काय ? अथवा यांना रुचि नाहीं असें नाहीं. महाबळेश्वरची गर्द वृक्षराजी पाहून यांचें मन प्रसन्न होणार नाहीं असें नाहीं. पण...पण काय ? पैसे खर्चावयाचें यांच्या जिवावर येतें ! दुसऱ्या कोणीं यांना स्वतःच्या खर्चानें अशा ठिकाणीं नेलें तर हे मोठ्या आनंदानें तेथें जातील, राहतील, पाहतील; पण पैसा खर्चून जाणें यांना नको ! यांना द्रव्यलोभी किंवा कृपण न म्हणतां, त्यांना तशी परिस्थिति लाभली, दुसरी लाभली नाहीं, म्हणून ते तसे बनले इतकेंच मी तर्क म्हणतों.

एकंदरींत काय, तर मी एकीएक काय तो महाबळेश्वरचा प्रवासी उरलों. व तो मी सायंकाळीं ५ वाजून गेल्यावर गाडींतून वाठार स्टेशनवर उतरलों. लगेज केलेली सायकल, पास दाखवून घेऊन स्टेशनच्या बाहेर आलों. वाठारपासून महाबळेश्वर ४० मैल असून पश्चिमाभिमुख होऊन जाणारांनीं जावयाचें होतें, अर्थात् सूर्यनारायण महाबळेश्वरास जाणाऱ्यांना अगदीं सन्मुख होऊन राहिला होता. मी बाहेर येऊन त्या मार्गाकडे व त्या अस्ताचलाप्रत संथपणें गमन करीत असलेल्या रविराजाकडे दृष्टि फेंकली व पायगाडीच्या साह्यानें मार्ग क्रमण्यास उद्युक्त झालों. तोंच एक मोटारवाला पुढें आला आणि तुम्हांस आतां फक्त एका तासांत महाबळेश्वरीं घेऊन जातों, तिकिट फक्त ५ रुपये;

विचार कसला करतां ? असें म्हणून मोटारमध्यें बसण्यास गला. मला वाटलें—हेंच ठीक आहे. आतांचा हा ४० मैलांचा ्रवास मो. नें केला तर पुढें महाबळेश्वरावर फिरावयाला पायगाडीचा आपणांस उपयोग घेतां येईल. नाहीं तर आतांच पायगाडीचे श्रम घेतल्यास पुढें महाबळेश्वरावर आपणांस गाडीवर बसून जाणें श्रमाचें होईल. या विचारानें मीं त्याचें म्हणणें मान्य केलें व मोटारींत बसलों. बसतांच ५ रु. रोख द्यावे लागले. १०।१५ मिनिटांनीं मोटार चालू झाली; आणि आतां महाबळेश्वर सूर्यास्तापूर्वींच, एक तासांत फक्त मला पहावयास मिळणार या आनंदांत मी गर्क होऊन गेलों.

पण तसें झालें नाहीं ! ४ मैल जातांच मोटार थांबली ! पंक्चर झालें ! तेथेंच आमचा अर्धा एक तास गेला. मोटारवाल्यानें दुसऱ्या ट्यूबस् बरोबर घेतलेल्या नव्हत्या. त्यामुळें त्यास पुष्कळ प्रयत्न करूनही, नळींत वाऱ्याची मोट बांधून मोटार चालू करणें अशक्य झालें ! ६॥ वाजले. अर्धा तास दिवस उरला. मोटारमध्यें आणखी ४ असामी महाबळेश्वराला जाण्यासाठींच निघालेले होते. पण आतां कोणाचा उपाय नव्हता. परत स्टेशनवर पायीं जाऊन रात्र तेथें काढावयाची व सकाळीं दुसऱ्या मोटारीनें निघावयाचें असें त्यांनीं ठरविलें. पण मला तितकी फुसरत नव्हती. शिवाय मजजवळ पायगाडी होती. त्यामुळें परत जाणें मला पसंत झालें नाहीं. मीं मोटारला बांधलेली आपली सायकल सोडून घेतली व रु. ५ मोटारवाल्याजवळ परत मागितले. त्याला ते परत द्यावयाचे नव्हते. त्यामुळें त्यानें पुष्कळ तंटा चालविला. परंतु मोटारींत आम्ही जीं ५ माणसें होतों त्यांत त्याच्या बाजूचें कोणीच नव्हतें. ते चौघेही असामी मजप्रमाणेंच त्याच्यावर, त्यानें आपल्या जाण्याची खोटी केली म्हणून नाराज झालेले होते, त्यामुळें त्याला हो ना करितां करितां माझे रु. ५ परत देणें भाग पडलें. रुपये हातीं पडतांच मी सायकलवर आरूढ होऊन रविराज व त्याच्याच अस्ताचलाच्या जागेवर तूर्त अधिष्ठित झालेला सह्याद्रि या दोघांकडे दृष्टि देऊन मार्ग चालूं लागलों.

सुखाचीं साधनें किती तरी वाढलीं आहेत; पण त्याबरोबर दुःखाचे व अपघाताचे आकस्मिक प्रसंगही वाढले आहेत. सारांश, याप्रकारें सुखाबरोबर व सोयीबरोबर दुःख व अडचणी यांचीहि अभिवृद्धि झाली आहे. त्यामुळें, हवायाचे वगैरे जमाखर्च करावयाचे असतां जशा जमेला व खर्चाला रकमा मोठ-

मोठ्या पडतात, पण प्रत्यक्ष शिलकेंत पहावें तों वाढहि नाहीं, अ
असा प्रकार आढळतो, तद्वत्च या सुखदुःखांची गोष्ट आहे. म्ह
साधनांची यादी बरीच मोठी झाली, परंतु त्यांबरोबर गैरसोयी अधिक वा
त्यामुळें, शेवटीं मनुष्याला जें स्वास्थ्य अथवा समाधान मिळावयाचें, तें मिळालेलें नाहींच. त्यामुळें जमाखर्चांतील पोकळ आंकड्यांप्रमाणें हा सुखदुःखाचा हिशेब फक्त दिखाऊ झाला आहे. आतां आमचाच प्रस्तुत प्रसंग पहा— ज्या चौघां आसामींना परत ४ मैल चालत जाणें आतां भाग पडलें, त्यांना हे एवढे श्रम म्हणजे किती भारी झाले ! पण १ तासांत ४० मैलांवर नेऊन पोंचविणारी सुखसंवर्धक मोटारच यांच्या या दुःखवर्धनास कारण झाली ! आतां हे स्टेशनवर परत जातील, तेथें त्यांची भोजनाची सोय काय होणार कोण जाणे ? शिवाय—ती एक झाली समजूं; तरी त्यांस निवाऱ्याचें पडावयाला तरी स्थान कसें काय मिळणार ! असा प्रश्न उभा राहिला व त्यामुळें ते चौघेहीजण चिंताक्रांत झाले ! हीं अशा प्रकारचीं सुखसाधनें वाढणें वरवर पाहणाऱ्या भौतिकवाद्यांच्या दृष्टीनें फार हितकर झालें असेल, परंतु वास्तविक पाहिलें तर मानवजाति ज्या सुखदुःखाच्या द्वंद्वांत गुंतली आहे, तें द्वंद्व तर यत्किंचित् ढिलें झालें नाहीं असेंच म्हणावें लागतें. परवां एका भोळ्या लेखकानें याच मासिकांत, या सुखसाधनवृद्धीवरून असा तर्क बांधला आहे कीं कलियुग संपत आलें असून सत्ययुगास सुरवात होत आहे ! सुखसमृद्धीचा पोकळ जमाखर्ची आंकडा असा पुष्कळ लोकांना मोह घालीत आहे ! आणि या साधनवृद्धीमुळें सुखाची वाढ झाली असें क्षणभर गृहीत धरलें, तरी सत्ययुगाच्या आरंभाचें तें चिन्ह म्हणतां येणार नाहीं. सत्याची प्रीति वाटूं लागली पाहिजे, व कलह, द्वेष, मत्सर इत्यादि वृत्ति ओहटत चालल्या पाहिजेत. म्हणजे सत्ययुगाची पहाट झाली असें म्हणतां येणार. नुसतें सुख वाढून काय उपयोग ! अर्थात् सुखसाधनें वाढणें व सत्ययुग येणें यांचा तर अर्थाअर्थी कांहींच संबंध नाहीं !

बरोबरीचे चौघे गृहस्थ परत ४ मैल चालत निघालेले पाहून भौतिक सुखसमृद्धीसंबंधीं वरीलप्रमाणें कांहीं विचार माझे मनांत आले, तोंच मी आणखी २।३ मैल पुढें गेलों. सायंकाळ झाला. रविराज सन्मुख असतां असतां अस्तास गेला, व त्याची सोबत जों कमी होऊं लागली, तोंच वायुदेवांनीं आपली सोबत मला दिली. आणि ‘ स्वभावो दुरतिक्रमः ’ या न्यायानें, सोबतीकरितां येऊनही त्यांनीं

चा पुष्कळ वेग हिरावून घेतला ! मी वळेंवळें सायकलचें पेडल मा असें होत आहे तोंच माझी सायकल शिरगांवच्या खिंडीच्या पहाव ठेपली. आतां तेथून २।३ मैल पर्यंत म्हणजे शिरगांवपर्यंत सारखा उतार होता. रात्रीचे ७॥ वाजले. सर्व प्रदेशभर अंधकारानें आपली कृष्ण छाया साधारणतः पसरून आपल्या वर्गाप्रमाणेंच ज्यांचीं हृदयें आहेत अशा मनुष्यांना आपापले कृष्ण व्यवहार खुशाल चालविण्याला परवानगी देऊन ठेवली. त्याचबरोबर, हा वेळपर्यंत मनुष्यभयानें दबून बसलेले डोंगराळ प्रदेशांतील पश्वादिक यांनींही आतां स्वैरविहारास निर्भयपणें आरंभ केला ! अशा स्थितींत मी एकदां त्या अपरिचित प्रदेशांत, सायकलच्या दिव्याच्या अल्प प्रकाशांत पुढचा रस्ता अवलोकन करीत त्या खिंडीच्या उतारावरून खालीं घसरत चाललों ! मनाला भीति वाटूं लागली. कोणी चोर येईल काय, अथवा या झाडींतून कोणी जनावर पुढें येईल तर ? जीविताचा लोभ मोठा विलक्षण आहे. जनावर आलें व त्यानें मला ठार केलें, तरी बिघडलें काय ? जनावराचें पोट भरेल. मला महाबळेश्वर पाहायचा होता, तर तो या जन्मीं नाहीं तर पुढचे जन्मीं पहावयास मिळता ! एकंदरींत भयाचें कांहींच कारण नव्हतें. परंतु भयाच्या कल्पना मनांत आल्यावांचून राहिल्या नाहींत; परंतु त्या फार वेळ टिकल्या मात्र नाहींत. दृष्टीला वेधणारें दृश्य पुढें उभें होतें. मनाला आणि शरीराला सुखविणाऱ्या दुसऱ्या गोष्टीही तेथें पुष्कळ होत्या. आधींच वारा समोरचा होता; त्याचा शीतळ स्पर्श मनास फारच संतोषवीत असून शरीरालाही उल्लसित करीत होता. २।३ महिने सारखा पुण्याचा तो कडक उन्हाळा अनुभवून महाबळेश्वरच्या भेटीस निघालेल्या माझ्या मनाला तो सायंकालीन समीरण अर्थातच अगदीं परम सुखदायक वाटला ! खिंडीचा रस्ता वारंवार सारखीं वळणें घेत चालला होता; एका अंगाला उंच तुटलेले डोंगर होते व दुसरे अंगास खोलच खोल दरी होती; आणि दोंहीं अंगांला वृक्षांची दाटीहि बरीच होती; त्यामुळें त्या मंद प्रकाशांत ती वृक्षदरींची शोभाहि मनाला खूप वेधीत होती. पुढील प्रवासाची ओढ नसती तर तास दोन तास तेथें ती वनश्री पाहत राहिल्याशिवाय मी खास पुढें गेलों नसतों ! पण सध्यां, उतरणीवरून, वळणें संभाळीत, सायकल वेगानें चालली असतां जेवढें अल्पस्वल्प दृश्यसुख घेतां येण्याजोगें होतें तेवढेंच घेऊन मी अतृप्त मनानें पुढें जात होतों. असले एकांत सकृद्दर्शनीं जरी भयप्रद असतात तरी दुसऱ्या पक्षीं ते

कवींच्या व तत्त्वविचारी मनुष्याच्या मनास परम आल्हाददायक उ
ते अगदीं मोहून वेडावून सोडतात. कवींना होणाऱ्या या सुखाचा
किंवा माझ्या मतें बराच भाग—या प्रसंगीं मला मिळाला. त्या वि...
निसटून जाण्यासाठीं माझी सायकल आपल्या परीनें खूप घाई करीत होती. तिच्या मनांतून आपण मोटारच्या वेगाचीच बरोबरी करावी, व पंक्चर झालेल्या मोटारीमुळें जो धन्याचा विरस झाला असेल तो अशा गतीनें आपण त्यास चटकन् पुढें नेऊन नाहींसा करावा, असें फार होतें. पण तिच्या या वेड्या नादाला मीं जर किंचित् संमति दिली असती तर मी आणि ती सायकल दोघेहि थोड्याच सेकंदांच्या अवधींत त्या दरीच्या वृक्षसंमर्दांत पहुडावयाला गेलों असतों. आणि इतके पूर्ण झोपीं गेलों असतों कीं १२ तासांच्या कित्येक रात्री किंवा २४ तासांचे कित्येक दिवस गेले असते तरी पुनः म्हणून उठलों नसतों! याबद्दल माझी खात्री होती; व म्हणून मी वारंवार ब्रेक दाबून गाडीला तिच्या त्या बालवृत्तीपासून परावृत्त करून वृद्ध जनांना शोभणारा गंभीर व प्रौढ वेग स्वीकारावयास भाग पाडीत होतों! याप्रकारें माझा व सायकलचा वेगाच्या संबंधांत मतभेद होऊन त्यांत मी आपला जय करून घेतला व एकंदर अर्धा तासपर्यंत त्या खिंडीचें तें एकांताचें सुख मीं अनुभाविलें. आतां ८ चा सुमार झाला. सायकलचा दिवा रस्त्यासमोरील ४।८ हात जागा तेवढी साधारणतः दाखवीत होता. अन्यत्र कोठें कांहीं दिसेनासें झालें. तोंच उतार संपून गाडी सपाटीवर आली. व मंद वेगानें किंबहुना वेगाच्या अभावानें खिंड संपल्याबद्दल ती मला सांगूं लागली तोंच समोरच्या भागांत १।२ दिवे दिसूं लागले व मी **शिरगांवच्या** हद्दींत येऊन पोंचलों.

शिरगांव रस्त्यापासून थोडें आंत आहे. पण रस्त्याला लागूनच एक फराळाच्या पदार्थांचें दुकान आहे. पुढील रस्ता अपरिचित व रात्र काळोखी, यामुळें पुढें जाणें मला शक्य झालें नाहीं. म्हणून या दुकानाच्या बाहेरच्या पडवींतच मी ही रात्र घालवावयाचें ठरवून तेथें उतरलों. बरोबर दशम्या घेतलेल्या होत्याच, त्या काढल्या व जवळच्या विहिरीवरून पाणी काढून आणून तेथें फराळ केला व ९ वाजतां तेथें झोंपीं गेलों.

नंतर पहांटे ४॥ ला उठून कपडे चढवून, दिवा लावून गाडी तयार केली व पश्चिमाभिमुख होऊन महाबळेश्वराच्या भेटीसाठीं मार्गस्थ झालों. सूर्योदय झाल्यानंतर वांईस पोंचलों. आतां पुढें जावयाचें, तोंच स्मरण झालें कीं,

मार्गदर्शक कोणी नाहीं. महाबळेश्वरावर गेल्यानंतर आपणांला पहावयाचे ते तेथें कोण दाखविणार? एलफिन्स्टन पाइंट, लाडविक ...र्ट, बॉब पाइंट, सावित्रीचें खोरें, प्रतापगडचा उघडाबोडका सुळा, व त्याचे इतस्ततः पसरलेले लहान लहान गिरिमित्र इ० आपणाला कळण्याला तज्ञ कोणी बरोबर पाहिजे. असा मार्गदर्शक म्हणजे **महाबळेश्वरवर्णनाचें** पुस्तक. त्याची १ प्रत बरोबर घेतली होती, पण जे एकजण मित्र आजारी होऊन परत गेले, त्यांच्याजवळ ती राहून गेली. तेव्हां वांईतील वाचनालयांतून त्याची दुसरी एकादी प्रत संपादन करावी आणि नंतर पुढें जावें असें मनांत आलें; व त्याप्रमाणें एका गृहस्थांच्या ओळखीचा उपयोग होऊन अर्धा-एक तास हिंडतां पुस्तक मिळालें. पुस्तक हातीं येतांच वांई सोडली आणि पुढें पांचगणी लक्षून मीं आपली सायकल चालू केली.

वांईपासून **पांचगणी** ८ मैलांवर आहे. पण वांई सपाटीवर आणि पांचगणी डोंगरावर. त्यामुळें पहिला १ मैल सोडून पुढें सातही मैल डोंगराची चढण चढावी लागते ! त्यामुळें या चढाला माझी गाडी चालेनाशी झाली ! जे आपल्या वैभवकालीं मोठे हुरळून जातात, त्यांना आपत्काल तिळमात्रही सहन करितां येत नाहीं; आणि सुखाला फार लाचावतात, ते दुःखाच्या वेळीं कमालीचे दीन होतात, हा पूर्वश्रुत सिद्धांत माझ्या गाडीनें या वेळीं मला नव्यानें सूचित केला ! कारण काल काळोखाच्या वेळीं **शिरगांवच्या** खिंडींतून उतरतांना हिनें जी घाई केली व जी उत्सुकता दाखविली, ती येथला चढ पाहतांच सर्व लयास गेली. आणि त्या बाईला हातानें लोटीत वर चढविण्याची मला पाळी आली ! मी ढकलल्याशिवाय एक रेसभर पुढें जावयाचें नाहीं अशी तिनें जणूं काय शपथच घेतली; मी अडलेला होतों. महाबळेश्वरावर पाईंट पाहण्यास हिंडतांना मला या बाईची फार गरज होती. त्यामुळें तिला वर चढवीत चढवीत ते ७ मैल चालत जाण्यास मीं आपली तयारी केली. मजजवळचें सामान मात्र सर्व तिनेंच वाहिलें. मीहि तेवढ्याचाच संतोष मानला. न मानून काय करणार ?

असो, या वेळीं सकाळचे ८॥-९ झाले होते. ७ मैलांची चढण मी चढावयास आरंभ केला होता. ऊन्ह वाढत चाललें होतें. त्यामुळें चढ अर्थात् त्रासदायक झाला. वाटेंत विशेष कांहीं सांगण्याजोगें घडलेंच नाहीं. शेवटीं एकदांची पांचगणी गांठली. खिशांतील घड्याळ काढून पाहिलें तों बारा वाजले

होते. पण वाचकहो, तूर्त पुढची हकीकत सांगत नाहीं. उन्हाचा आपण थोडीशी विश्रांति घेऊन मग पुढचे प्रवासास आरंभ करूं.

# पांचगणी आणि नहर.

मागील प्रसंगीं वर्णन केलेली ७ मैलांची चढण चढून, व उन्हाचा मनस्वी त्रास सहन करीत, १२ वाजेपर्यंत मीं जो घाट ओलांडिला त्याचें नांव **पसरणीचा घाट** असें आहे. वांईपासून थोड्या अंतरावर पसरणी म्हणून गांव आहे, व त्याचे एका बाजूनें हा डोंगराचा चढ लागतो. त्यावरून त्यास त्या गांवाचें नांव पडलें आहे. उन्हामुळें या चढावावर मला बराच त्रास वाटला. कोणी या घाटानें येणार--जाणार असतील, तर ते जर पादचारी असले, तर त्यांनीं ही उन्हाची वेळ अवश्य टाळावी. पण मला झालेला उन्हाचा त्रास पुढें माझ्या उपयोगींच पडला! मी पांचगणीस पोंचलों मात्र तों तो उन्हाचा त्रास पार नाहींसा होऊन असा सुंदर गारवा मला मिळाला कीं तेथें येतांच मला स्वर्गांत किंवा नंदनवनांतच मीं आलों आहें असें क्षणभर वाटल्यावांचून राहिलें नाहीं! वाचक म्हणतील ही सर्व अत्युक्ति आहे. पण माझी वाचकांस आग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं एकवार पांचगणीपर्यंत चलावेंच. आणि पसरणीचा घाट चढण्याचे थो[illegible]श्रम घ्यावेच. मग त्यांना जर हें माझें म्हणणें अत्युक्तीचें वाटलें तर मी बोल घेण्यास तयार आहें! खरोखर, पांचगणीच्या मुख्य यावरस्त्यावर मी पोहोंचलों तेव्हां तेथील ती दुतर्फा उंचउंच असलेली झाडी, थंड व गोड अशी आल्हादकारक हवा, व मधून मधून वाऱ्याच्या मंजूळ लहरी यांनीं स्पर्शसुखाची व नयनसुखाची मला आकंठ मेजवानीच दिली! मी वर्णन करीत आहें हें अपुरें आहे. याहून सुंदर वर्णन करून वाचकांपुढें तो देखावा मला हुबेहूब उठवून देतां येत नाहीं याबद्दल वाईट वाटतें. व ह्मणूनच मला विनंति करावी लागत आहे कीं, वाचकहो, एकदां वेळांत वेळ काढा, सवड कराच; आणि या सह्याद्रिशैलशिखरावर, या महाबळेश्वरावर एकदांचे याच! पुराणांतला खरा स्वर्ग कदाचित् मनोमय असेल; किंवा कदाचित् तो तपःश्चर्यादि कष्टतम उपायांनींच प्राप्त होणारा असेल, व म्हणून त्यास दुर्गम असें एकवार ह्मणतां येईल. परंतु भूमीवर उतरलेला हा स्वर्ग इतका सुलभ असतां

ीं तो आपल्याला कां अंतरू द्यावा ! असें हें परम रमणीय, नि-ल, व तेथील नयनमनोहर दृश्य, उत्कृष्ट हवा आणि निर्मल व तल जल यांचा मनसोक्त लाभ निकटवासी महाराष्ट्रीय जनांनीं न घेतां दूरस्थ जे युरोपीय त्यांनीं मात्र घ्यावा हें किती चमत्कारिक आहे! अशानें महाराष्ट्राकडे अरसिकपणा येऊं पाहतो. पण तूर्त तरी अशी स्थिति आहे खरी. असो.

पांचगणीला पोंचतांच क्षुद्विकारानें अस्वस्थ झालेल्या मनाला व शरीराला प्रथमतः फराळाचा डबा उघडल्याशिवाय चैन पडेनासें झालें. मग तेथें एका शीतल वृक्षच्छायेखालीं बसून अल्पाहार करून मी क्षणभर तेथेंच लवंडलों. 'आपण घेतलेल्या श्रमाचें सार्थक झालें; आतां महाबळेश्वरीवर प्रायः आलोंच ह्मणावयाचें; आतां येथें जर एवढी शीतलता व रमणीयता वाटत आहे, तर खुद्द महाबळेश्वरास, ज्यास लोक नहर ह्मणतात, तेथें तर किती आनंद अनुभवास येईल कोण जाणे,' असें म्हणत मी त्याची कल्पना करूं लागलों. परंतु कल्पना काय करतां येणार? कशाच्या आधारावर कल्पना करावयाची? पण मला वाटलें कीं—माझे दोघे मित्र मजबरोबर आले नाहींत ही त्यांनीं मोठी चूक केली. त्यांनीं हा मोठा सौख्याचा व आनंदाचा प्रसंग गमविला. आतां ते पुनः केव्हां येणार? अथवा त्यांची रसिकता पुनःहि एकादे वेळ उचल खाईल व ते पुनःहि येतील कदाचित्. इतक्यांत अशी कल्पना आली कीं, दुःखाच्या अनुभवाशिवाय सुखाची कल्पना होऊं शकत नाहीं काय? मी पुण्याहून आलों, तेथील उन्हाळ्याच्या कडक हवेचा त्रास अनुभविला, त्यामुळें येथील या सर्वसुंदर हवापाण्याचा मोठा आनंद मला मिळवितां आला! परमेश्वरानें हें असें द्वंद्व अगदीं कसें जखडून ठेविलें आहे कीं, कोणताही पदार्थ स्वतंत्रपणें मनुष्याला सुखहि देत नाहीं व दुःखहि देत नाहीं [illegible] घटना मोठी चमत्काराची वाटली व हें सुखदुःख 'जलपंकवत्' परस्पर संमिश्र झालें असल्याबद्दल अध्यात्मरामायणांत जें लिहिलें आहे तें अगदीं योग्य आहे असा निश्चय झाला. पण तात्त्विक विचारांत खोलवर जाण्याची त्या वेळीं मला इच्छा नव्हती. अंगावर गर्द छाया करून उभे असणारे वृक्ष व त्यांचे जवळजवळचे दुसरे बंधु यांच्याकडे डोळे अगदीं ओढ घेत होते. त्यामुळें मी क्षणभर बसून तर पुनः क्षणभर आडवें होऊन, क्षणभर या अंगाला तर क्षणभर त्या अंगाला, असा सारखा वेड्यासारखा पहातच राहिलों! आतां हें पाहणें पुरें करावें व उठावें या गोष्टीला मन लौकर तयारच होईना. तेव्हां मी मनाला बोध कर-

ण्याचा आव आणूनें म्हटलें—मूर्खा, एवढ्यावरच तूं इतकें भुललेंस ढील त्या ऐन शैलशिखरावर गेल्यावर तुझी दशा काय होईल? पण माझ्या असें ध्यानांत आलें कीं, ही उपदेशाची वेळच नव्हे. पदार्थावर क्त झालेलें मन त्याचा पूर्ण सुखभोग घेतल्याशिवाय बोधाला योग्य नाहीं, असा सिद्धांत असल्यामुळेंच शास्त्रकारांनीं ब्रह्मचर्यांतून एकदम संन्यासाकडे न जातां गृहस्थ, वानप्रस्थ इत्यादि चार पायऱ्या करून ठेविल्या आहेत. तेव्हां आणखी थोडा वेळ येथें पडावें, म्हणजे पुढें जाण्यास हें चंचल मन आपोआप तयार होईल.

असा विचार केला, आणि उठलोंच! लगेंच गाडीवर स्वार झालों आणि चालूं लागलों. आतां फक्त १२ मैलांवर महाबळेश्वर होतें. हें **महाबळेश्वर म्हणजे नहर.** यासच **मालकम पेठ** असें म्हणतात. हा सर्व रस्ता डोंगर-सपाटीवरूनच होता. आतां समुद्रपृष्ठापासून सुमारें ४ हजार फूट उंचीवरून मी जात होतों. थंड हवेच्या सुखाचा अनुभव तर पांचगणीपासूनच सुरू झाला होता. हवेच्या या गुणामुळें या पुढच्या प्रवासांत श्रम असे मुळींच भासले नाहींत. या बारा मैलांत चढउतार बरेच आहेत. कांहीं रस्ता सपाट आहे. आतां माझी गाडी मोठ्या उल्लासानें आपलें काम करूं लागली. रस्त्याच्या दोहों अंगांस झाडी बरीच होती. त्यांनीं रस्त्यावर बहुधा छाया केलेलीच होती. सायकलच्या वेगामुळें वारा तर सारखा वीजनाचें काम करीत होता. मधून मधून आपण किती उंचीवरून चाललों आहों हें ध्यानांत यावें व आसपासच्या दूरवर पसरलेल्या सखल प्रदेशांचें व दऱ्यांचेंही दर्शन व्हावें या खऱ्या कळकळीच्या हेतूनेंच जणूं रस्त्याच्या बाजूला वृक्षांनीं थोडथोडी रिकामी जागा ठेविली होती. तींतून वारंवार आसपासचे सर्व विस्तृत प्रदेश दृष्टीस पडून ते आपापल्या परी मनाला वेधीत व रमवीत होते. याप्रमाणें मार्गक्रमण चालतां चालतां १॥चे सुमाराला मी एका तलावावर येऊन पोंचलों. या तलावाचें नांव **वेण्यातलाव.** विस्ताराच्या मानानें या तलावाला फारसें महत्त्व देतां येत नाहीं. तरी यांतील शीतल व निर्मल उदक व सभोंवतालची गर्द हिरवीगार झाडी हीं पाहणारांच्या अंतःकरणाला संतुष्ट करण्यांत आपणाकडे मुळींच उणेपणा येऊं देत नाहींत. येथूनच वेण्या नदीचा उगम समजतात. या तलावाच्या एका अंगास एक अर्धा फर्लांग लांब असा बंधारा बांधला असून बाकीच्या सर्व अंगांस डोंगराचे चढते भाग अर्धा मैल उंचीचे दिसत

र्थात् त्यांजवर सर्वत्र हिरवीगार दाट झाडी आहेच. मालकम श्रे त्यांचीं शिखरें मधून मधून यांत दृग्गोचर होतात. त्याशिवाय ...चा हा सर्व गालीचा आकाशापर्यंत भिडलेला दिसतो. त्या स्थळीं येतांच त्याच्या कांठच्या गर्द झाडीनें माझें मन वेधलें, म्हणून झाडींत पडून कांहीं वेळ विश्रांति घेण्याचा मीं बेत केला. वेळ दुपारची—लोकांच्या चांगल्या रहदारीची होती. त्यामुळें निर्भयपणें झाडींत पडून राहण्यास कांहींच हरकत नव्हती. तेव्हां गाडी झाडाशीं टेकवून मीं एक धोतर खालीं टाकलें, व क्षणभर पडून तेथील विश्रामसुख अनुभवूं लागलों. श्रमहि बरेच झाले होते व वेळही उन्हाची होती. पण निद्रादेवीनें भेट दिली नाहीं. मलाहि तिच्या भेटीची विशेष उत्सुकता नव्हती. त्या हिरव्यागार वृक्षसंमर्दाकडे—निसर्गानें बनविलेल्या त्या अद्भुत व रम्य गालीच्याकडे पाहत राहण्याशिवाय दुसरे कांहीं करण्याला माझे नेत्र अनुकूल नव्हते. पण तें सुंदर दृश्य पाहतां पाहतां मनांत किती तरी प्रकारचे विचार उसळूं लागले तें सांगतां येत नाहीं. उपनिषत्काळीं मुनिजनांनीं जे थोर व गम्भीर विचार स्वतः शोधले, व आपल्या शिष्यजनांना परम पुत्र-वात्सल्यानें पढविले, तीं हींच तपस्यास्थानें होत असें वाटून मला फार आनंद झाला. त्यामुळें माझ्या कल्पनासृष्टींत मला ते त्या **थोर ऋषींचे दिव्याश्रम** दिसूं लागले. एक ब्राह्मणाचा मुलगा चौदा विद्या व चौसष्ट कला शिकण्याकरितां गुरूकडे गेला व कांहीं कालानें तो त्या सर्व गोष्टींत प्रवीण होऊन परत घरीं आला. बापाला मोठा आनंद झाला. पण ८ दिवस गेले, १५ दिवस गेले, महिना गेला; इतका विद्वान् मुलगा कोणत्याच उद्योगाला प्रवृत्त म्हणून होईना! तेव्हां त्या उपनिषत्कालीन ब्राह्मणानें त्या मुलाला जवळ बोलावून प्रश्न केला—बाळ, तूं इतका विद्यावान् व कलावान् झालास; आणि असा मुग्धपणें स्वस्थ कसा राहतोस? गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून श्रेष्ठ लोकांना उचित असा स्वर्गदायक पुण्यप्राप्तीचा मार्ग तूं कां स्वीकारीत नाहींस! तेव्हां त्या मुलानें त्यास उत्तर दिलें—बाबा, कांहीं शास्त्रें सांगतात 'कर्म करावें;' व कांहीं सांगतात 'कर्म करूं नये!' त्यामुळें यांत योग्य कोणतें व अयोग्य कोणतें त न समजून मी स्वस्थ राहिलों आहें. मीं अधीत केलेली विद्या या प्रश्नाचा निर्णय करण्यास पूर्ण समर्थ नाहीं! अशा प्रकारचें उत्तर देणारा व गूढ विचारांत निमग्न झालेला तो ब्राह्मणपुत्र आणि आत्मज्ञानाच्या गूढ प्रदेशांत प्रवेश करण्यास

आपल्या मुलाची बुद्धि कशी पूर्ण समर्थ झाली आहे हें पाहून ... झालेला तो ब्राह्मण; दोघेही मला तेथें दिसूं लागले. व त्यांच्या ... येऊन वनश्रीचा मनमुराद पाहुणचार घेत असलेला मी त्यांचा आतिथ्य झालो असून त्यांचीं प्रश्नोत्तरें जणूं स्वच्छ्यांच ऐकत आहें असें मला वाटलें ! क्षणभरानें तें उपनिषत्कालीन कल्पनाचित्र दूर झालें व असा विचार मनांत आला कीं, खरोखरच गूढ विचारांत मन व बुद्धि यांचा प्रवेश व्हावयाला असल्या नितांत-रमणीय निसर्गस्थानांची संगति घडली पाहिजे. आपले नित्याचे व्यवसाय व त्याच व्यवसायांत गढून गेलेले आपले परिचित लोक यांमध्यें राहून मनाला ही उच्च भरारी मारण्याची ताकद येणें नाहीं. आणि याचमुळें पूर्वकालीं आपल्या आर्यजेनांनीं धर्माच्या पूर्ण रहस्यांत शिरून आपलें पारलौकिक हित साधलें; व त्याच बुद्धिप्रावीण्यानें इहलोकींही आपल्याला उच्चपद प्राप्त करून घेतलें ! परंतु आज आम्ही त्यांचे वंशज धर्मज्ञान जाणत नाहीं व व्यवहारही जाणत नाहींसें झालों आहोंत. सृष्टीचें फुकटचें निसर्गसौंदर्य व एकांतसुख यांचें तर आम्हांला नांवही ठाऊक नाहीं ! प्रिय हिंदुस्थाना ! तूं आपले पूर्वीचे इहपर वैभवाचे दिवस आतां पुन: केव्हां अनुभवास आणशील ?

असे विविध विचार मनांत येत होते, व दृष्टि तलावाच्या शीतल जला-कडे व तन्निकट भागाच्या हिरव्या वृक्षांच्या गालिच्याकडे सारखी वेधून एकाग्र झाली होती. पण एक पदार्थ प्राप्त झाला व तो मनाला कायमचा आ-कर्षून ठेवण्यास समर्थ झाला असें कधीं झालें आहे? याला फक्त एक अपवाद, आत्मा ! बाकी सर्व दृश्य पदार्थ मनराजाच्या मर्जींतून वारंवार उतरतात व पुन: मर्जींत भरतात. त्याप्रमाण पुढ मालकमपेठेंत जाण्याचा वेध लागून, आ-पणाला मोठा सृष्टिसौंदर्याचा रसिक समजणारा मीही त्या सुंदर गालिच्यावर-ची दृष्टि परत ओढून आतां पुढें मालकमपेठेकडे निघालों !

येथून **मालकम पेठ** सुमारें १ मैलावर आहे. हा एक मैल सारखी चढण आहे. विसांवा चांगला मिळाला असल्यामुळें ही १ मैलाची चढण मला कांहीं फारशी वाटली नाही. मी अर्धपाव तासांत खुद्द मालकमपेठेंत येऊन पोंचलों. एक फर्लांग लांबीची मोठी बाजारपेठ आहे, हीच मालकम पेठ. याचेंच नांव नहर. या पेठेच्या आसपास कांहीं थोडी वस्ती आहे. मिळून सर्व गांव झालें. गव्हर्नरसाहेबांचा बंगला व दुसऱ्या पुष्कळ लोकांनीं बांधलेले बंगले येथें आसपास सर्वत्र आहेत. पण ते अतिशय दूरदूर आहेत. असे बंगले २०० तरी असतील.

ल्यांना येथें कॉटेज (झोंपडी) असें म्हणतात. मुख्य बाजारपेठेंत
वीं दुकानें आहेत. सर्व पदार्थ मिळणारे असून त्यांच्या किंमतीही
बाजारापेक्षां अधिक नाहींत. फळफळावळ सर्व मिळते. खाणावळही
येथें एक आहे. रस्त्यावरच एक रामाचें देऊळ आहे. मी रात्रीस याच देवळांत वस्ती करण्याचें ठरविलें. व्यवस्थापकांस परवानगी विचारतांच त्यांनीं ती मोठ्या सौजन्यानें व अगत्यपूर्वक दिली. मजजवळ दशम्यांचा पुरवठा पुष्कळ होता, त्यामुळें खाणावळींत जाण्याची मला गरज नव्हती. तरी पण चहा घेण्याची इच्छा झाली. चहा हें एक उत्तेजक पेय आहे. तें एकादे वेळीं घ्यावयाचें म्हटलें तरी नित्याची संवय होऊन तें एक व्यसन होऊन बसतें, व त्यांतून सुटणें मग बहुधा दुरापास्त असतें. त्यामुळें शक्य तितक्या थोड्या पदार्थांत आपला व्यवहार उरकावा, गरजा कमी कराव्या व अशा प्रकारें ' अपरिग्रही ' होऊन खऱ्या श्रीमंतीची जोड करावी अशी इच्छा असणाऱ्या लोकांना चहा इष्ट नाहीं हें खरें आहे. परंतु केवळ इंग्रजी पेय म्हणून त्यास दोषी समजणें योग्य नाहीं. त्यामुळें मी प्रवासश्रमनिवारणाच्या अपेक्षेनें याचें सेवन केलें. व उरलेल्या वेळांत एकाद्या पॉइंटवर जाऊन यावें, अशा हेतूनें जवळचें दीक्षितकृत महाबळेश्वरवर्णन काढून त्याची अनुक्रमणिका चाळूं लागलों.

मालकमपेठ, ही एकच पेठ, परंतु फार रमणीय आहे यांत शंका नाहीं. रस्ता बराच मोठा असून शिवाय सर्व घरांच्या पुढच्या बाजूस मोकळी जागा बरीच सोडली असल्यानें रस्त्याला दुप्पट भव्यपणा आला आहे. दर एक घरापुढें एकेक झाड राखून ठेवलेलें असल्यानें सर्व रस्त्यावर त्याची चांगली छाया पडते व त्यामुळें उन्हाचा त्रास अगदीं भासत नाहीं. हवेचा गारवा तर फारच आल्हादकारक आहे. केव्हांही विशेष उकाडा व्हावयाचा नाहीं व केव्हांही विशेष थंडी वाजूं लागेल असें व्हावयाचें नाहीं. अशी समशीतोष्ण हवा, व दृष्टि फेंकावी तिकडे रमणीय वृक्षसंमर्द असें हें समुद्रपृष्ठापासून ४५०० फूट उंचीचें ठिकाण जेव्हां कोणाला यथेच्छ विहारावयाला लाभतें, तेव्हां पंखावांचून अशा स्वर्गांत आपण चढून आलों असा त्या मनुष्याला क्षणभर तरी प्रत्यय आल्यावांचून राहत नाहीं. इतक्या उंचीचें ठिकाण दक्षिणेस निलगिरी व उत्तरेस हिमालय पर्वतापर्यंत दुसरें एकही नाहीं. असें हें सह्याद्रि गिरिराजाचें शिखर आम्हांला सुखानुभवार्ह कोणीं करून ठेवलें म्हणाल, तर इंग्रजांनीं. त्यांनींच खोल अरण्यांत प्रथम प्रवेश केला, व असें सुंदर हवापाण्याचें ठिकाण

शोभलें ! जिवावर उदार होऊन ज्या साहेबानें येथें आंत शिरतां
कुत्रा आपल्या समक्ष येथील अरण्यनिवासी व्याघ्रवराला फाडून …
पण इतकें झालें असतांही या गिरिशिखराचा ठाव घेण्याचा आपला … सोडला
नाहीं, त्याच्या त्या वेळच्या साहसी वृत्तीला आज जें हें रमणीय फळ आलें आहे, कीं जें आज आपणां सर्वांना यथेच्छ अनुभवितां येतें—तें पाहून त्याच्या धैर्याबद्दल साहजिकच कौतुक करावेंसें वाटल्यावांचून राहत नाहीं ! लागलीच मला हें कबूल केलें पाहिजे कीं, हा इंग्रजांचा गौरव आपल्या आजच्या लोकस्थितीच्या दृष्टीनें होय. आपल्या पूर्वजांच्या धैर्याच्या व पराक्रमांच्या मानानें हें या साहेबाचें साहस म्हणजे खरोखर कोण्या झाडाचा पाला असें ठरणार आहे हें मला माहीत आहे. ज्या मावळे लोकांनीं श्रीशिवरायाच्या भगव्या झेंड्याच्या आश्रयाखालीं या गिरिवराच्या दऱ्याखोऱ्यांत आपला नेहमीं तळ देऊन, कर्दनकाळ अशा मोंगलांच्या सैन्याला दाद लागूं दिली नाहीं, व त्यायोगें या डोंगरांतल्या उंदरानें त्यांचें सर्व राज्य हिसकावून घेऊन स्वराज्याची स्थापना केली, त्यांचा पराक्रम क्षणभर तरी महाराष्ट्रीयांस विसरतां येईल काय ! पण ते महाराष्ट्र—वीरांच्या अतुल धैर्यवीर्याचे दिवस आज गेले ! तो महाराष्ट्राचा वैभवसूर्य आज अस्तंगत झाला !' आणि प्राप्त झालेल्या रात्रींच्या काळोखांत इंग्रजांच्या पराक्रमांचा चंद्र सध्यां विराजमान झाला आहे ! तेव्हां बा ईश्वरा ! तुझ्या या अघटित घटनापटुत्वाची कमाल आहे खरी !

असो; उरलेल्या वेळांत **बॅबिंग्टन पॉईंट** पाहून यावयाचें मीं ठरविलें, आणि वाहनावर आरूढ होऊन निघालों. मालकम पेठेपासून दक्षिण दिशेस २ मैलांवर हा पॉइंट आहे. पॉइंट म्हणजे डोंगराचें एक टोंक—किंवा पुढें आलेला फांटा, असें म्हटलें तरी चालेल. सर्व पॉइंट्स हे मालकम पेठेपासून खोल आहेत; त्यामुळें कोणत्याही पॉइंटवर जातांना सर्व रस्ता थोडा फार उतरणीचाच आहे. बाबिंग्टन पॉइंट २ मैलांवर आह खरा, पण या उतारामुळें ७ किंवा ८ मिनिटांपेक्षां अधिक वेळ माझ्या गाडीला कांहीं लागला नाहीं. दोन्ही मैल रस्त्याच्या दोहों अंगांस खूप दाट अशी झाडी आहे. तीनतीन पुरुष उंचीचीं तर तीं झाडें आहेतच. त्यांच्याकडे सारखें पहात आणि सायकलच्या अत्यंत वेगामुळें सहजप्राप्त अशा वायुदेवाच्या वीजनाचें सौख्य घेतघेत माझीं तीं ५।७ मिनिटें ५।७ सेकंदांसारखीं मनाला न कळत जणूं निघून गेलीं व

च्या प्रेक्षणीय स्थानावर येऊन उभा राहिलों. हवा खाण्यासाठीं सार्टी येणाऱ्या लोकांच्या सोईसाठीं येथें थोडीशी विस्तृत जागा २१४ बाकें मांडिलीं आहेत. सर्व पॉइंट्सवर अशी व्यवस्था केलेली आहे. तेथें गाड्या उभ्या करावयाच्या. पादचारी लोकांना येथून पुढें आणखीं पाव मैलपर्यंत खोल खालीं जातां येतें. पॉइंटवरून दिसणारा देखावा मला अपुरा वाटला, व त्यामुळें ती पाऊलवाट मी शोधून काढून, गाडी पॉइंटवरच एका बाकाशीं टेकवून ठेवून खालीं उतरून गेलों. आणि थोडा उघडा प्रदेश पाहून चोहोंकडे सृष्टीचें स्वरूप अवलोकन करूं लागलों. २०-२५ मैलांच्या प्रदेशभर दृष्टि पोंचून, व तेथवर सारखे डोंगरच डोंगर पसरलेले पाहून फार आल्हाद वाटला. या वेळीं सूर्यनारायणांनीं थोडीशी अवकृपा केली, कारण वेळ सायंकाळची असलेमुळें सर्व भाग धूसर झाला होता. समोर खालीं खोल कोयना नदीचें खोरें तेवढें स्पष्ट दिसत होतें. उजवे बाजूस एक डोंगराचा फांटा पुढें आला होता. त्यावर जाऊन तिकडील शोभा पाहावयाचें मनांत आलें. त्याचें नांव **बॉंबे पाईंट**. पण तिकडे जाण्यासाठीं परतलों तों सूर्यास्ताची वेळ झाली. त्यामुळें मालकम पेठेस जाऊन रात्रभर विश्रांति घेणें अवश्य झालें. अर्थात् त्या परत येण्याच्या चढाच्या मार्गावर कोठें सायकल चालवीत, तर कोठें ती हातीं धरीत मीं परत राममंदिर गांठलें व अल्पाहार करून पथारी टाकून पहुडलों. विविध सुंदर दृश्यें पाहून मन भुललेलें होतें, तरी श्रमही बरेच झाले असल्यामुळें निद्रेनें आलिंगन देण्याला फारसे आढेवेढे घेतले नाहींत. वाचकहो, आतां पुढची गोष्ट पुढें पाहूं.

## बॉंबे आणि लाडविक पॉइंट्स.

सृष्टिसौंदर्याची आवड असणें हें मनुष्याला भूषणावह आहे, असें सर्वांचेंच मत पडेल. परंतु तें एक व्यसन आहे असें म्हणणें मला योग्य वाटतें. किंबहुना इतर पुष्कळ व्यसनांपेक्षां तें मोहक आहे यांतही मला शंका वाटत नाहीं. आतां इतर व्यसनांप्रमाणें हें हानिकारक नाहीं, उलट मनुष्याला फार हितावह आहे; किंबहुना तें मनुष्याचें इहपर कल्याण करणारें आहे असें कोणी म्हणतील, तर तेंही मला मान्य आहे. परंतु सर्व व्यसनांमध्यें जो गुण असतो तो,

म्हणजे मनाला अत्यंत चटका लावून वेधून घेणें, हा त्यामध्यें उत्कृष्टपणाचा गुण आहे यांत शंका नाहीं. महाबळेश्वरावरील वनशोभा जेव्हां मीं पाहिली, निरनिराळ्या पॉईंटवरून सृष्टिदेवीचें परम विस्तृत, आल्हादकारक व गंभीर स्वरूप जेव्हां मला थोडेंसें अवलोकन करतां आलें, तेव्हां माझी जी चमत्कारिक स्थिति झाली ती सांगतां येत नाहीं. मला शक्यता नव्हती, याचें मला फार वाईट वाटतें. परंतु शक्य असतें तर तो महाबळेश्वरचा आणि तेथील त्या पूर्वऋषींच्या निवासानें परमपवित्र अशा व अनिवार वृक्षसंमर्दामुळें परम गूढ स्थानाचा—ब्रह्मारण्याचा निवास मीं कधीं-कधीं सोडला नसता ! पण काय करणार ? मला वाटतें कीं, खुद्द लो. टिळक जर या ठिकाणीं येते व या ब्रह्मारण्यांत एकटेच मौजेनें भटकत एक वेळ जरी गेले असते, तरी त्यांना सुद्धां आपलीं देशोन्नतीचीं सर्व कर्तव्यें सोडून येथेंच कायमचें रहावेंसें वाटलें असतें ! आणि अशा प्रकारें एकदां सृष्टिदेवीनें त्यांचें मन वेधलें असतें म्हणजे ‘ ज्ञानी पुरुष गेंड्यासारखा अरण्यांत कसा व कां भटकत राहतो ’ याचें रहस्य त्यांना चांगलें कळून येऊन, गीतारहस्यांत आपण ज्ञानी पुरुषास गेंडा म्हणून जो विनोद केला तो यथार्थ नाहीं असें त्यांना स्वतःलाच वाटूं लागलें असतें ! पण छे, हें मी काय लिहितों ? तो कट्टा कर्मयोगी. सृष्टीनें त्याजपुढें आपलें सर्व सौंदर्याचें कपाट जरी उघडून ठेविलें असतें, तरी तो स्वकर्तव्यांत तिळभर उणें पडूं देता ना ! सृष्टीच्या सौंदर्याला भुलून वेडें होण्याचें काम स्वामी रामतीर्थांचें ! तसला नादिष्टपणा लो. टिळकांनीं कधींच केला नसता. संदरील स्वामी म्हणजे असल्या वेड्यांच्या अग्रभागीं शोभण्याजोगे ! उद्योगानें गजबजलेल्या अमेरिकेसारख्या देशांत जाऊनही ही स्वारी एखादा झुळझुळ वाहणारा झरा शोधून त्याच्या कांठच्या वाळूवर तासचे तास पडून रहावयाची व तेथें यांचें ॐ चें ध्यान मोठें अविरत चालावयाचें ! आणि इतकें करूनही, सारी अमेरिका आळशी आणि ओढ्याच्या कांठीं तासचे तास पडून राहणारा हा राम म्हणे उद्योगी, असें वर सांगून मोकळे ! असे हे लोकविलक्षण लोक ! पण यांना असे वेडेपीर कोणीं बनविलें ? सृष्टीच्या या निसर्गसौंदर्यानें ! दुसरे कित्येक लोक—ज्यांना कवि असें नांव देण्यांत येतें—ते देखील आपलें कर्तव्य कोणतें तें नेणून, पाखरासारखे रानावनांत भटकत राहतात—आणि फुलवेलींच्या आणि कोकिळादि खगवरांच्या संगतींत राहून कांहीं तरी गाणीं गात सुटतात, त्यांनाही असे वेडे

...ं कोणीं ? तर याच सृष्टिसौंदर्यनिधीनें ! बा ...पणं आढळत... दोष देऊं कीं त्याचे गुण गाऊं ? आम्हाला ... आणि ... परमात्म्याची भेट करवून देणाऱ्या तुला धन्य म्हणावें कीं—ज्ञानीजनांना गेंड्यासारखें भटकण्यास तूं प्रेरक होत असल्यामुळें कर्मयोग्यांच्या बाजूस वळून तुला अपराधी धरावें ? याचा निर्णय तूंच जेव्हां एकदां सांगशील तेव्हांच तो आम्हांला पटेल. आणि प्रिय मित्रा ! दीर्घकाळ मौन स्वीकारून अवघडून गेलेल्या तुझ्या मनाला क्षणभर दोन विसाव्याचे शब्द बोलावयाला अशा मूढ सृष्टिप्रेमी कविजनांशिवाय दुसरें कोण आणि केव्हां भेटणार आहे सांग बरें ?

असो. **मालकमपेठें**तील राममंदिरांत रात्रभर भरपूर निद्रासुख घेऊन सकाळीं उठून तो सर्व दिवस मीं जे निरनिराळे पॉइंट्स पाहिले, त्यांची हकीकत वाचकांस सांगावयास बसलों असतां वर लिहिली एवढी प्रस्तावना पुरे झाली. आतां प्रकृत विषयाकडे वळतों. रात्रींच पुस्तकावरून पॉइंट्स व त्यांचे मार्ग अथवा दिशा मीं ध्यानांत घेऊन ठेविल्या होत्या. त्यास अनुसरून मीं सकाळीं ६ ला **बॉम्बे पॉइंट**कडे जाण्यासाठीं आपल्या यांत्रिक अश्वावर आरूढ होऊन पश्चिमदिशा अनुलक्षून निघालों. या पॉइंटला दोन रस्ते, गव्हर्नमेंट हाउसच्या दोहों अंगांनीं, जातात. तेथें येऊन मी एका रस्त्याला लागणार तोंच तेथें तिसरा एक लहान रस्ता असून त्यावर '**टायगरपाथ**' म्हणून एक बोर्ड लावलेला दिसला. तोंच तिकडे फिरण्याची उत्सुकता उद्भवून गाडी तिकडे वळविली. टायगरपाथ म्हणजे वाघाचा रस्ता. तेव्हां अशा रस्त्याकडे मी एकाकीं वळतांच मला वाटलें—मी हें साहसच करीत आहें. वाघोबांच्या या रस्त्यावर एकादे वाघोबा भेटले तर ?..... तर काय, तर अध्यात्मशास्त्रांतलें जें परमगुह्य—मृत्यूनंतर काय ?—त्याच्या अनुभवाला मी एकदम पात्र होईन ! परंतु असल्या त्या गूढ अनुभवाला पात्र होण्याची इच्छा मला होती काय ? अर्थात् नाहीं. मला घनदाट झाडींतून फिरावयाचें होतें ! वाघोबा जसे एकांतांत राहतात, व अशा विपुल वृक्षसंमर्दांतून मधून मधून गर्जना करीत भटकतात, त्या एकांतांत शिरण्याची व अर्थात्च वाघाप्रमाणें—किंवा गेंड्याप्रमाणें म्हणा—भटकण्याची मला हौस होती. त्यामुळें मी निर्धास्त निघालों. हा रस्ता ३॥ मैल आहे. जातांना सर्व उतार आहे. त्यामुळें गाडी खूप वेगानें घसरत जात होती. अर्थात वाघोबाच्या आरो-

ऱ्यांत मी सांपडणार नाहीं असा मला भरंवसा वाटत होता. रस्त्यानें मी परत कसा येणार? परतीच्या चढावर गाडी च मग गाडी हातीं धरून पायीं चालावें लागेल व तेव्हां मी वाघो- पासून मी आपला बचाव कसा करणार, असें भय मला वाटूं लागलें. आणि भिन्नाभिन्न प्रकारचे सुखदुःखांचे अनुभव येऊन मनुष्याला शहाणा करण्याचें काम कनवाळूपणानें ज्या शिक्षकानें आपणाकडे घेतलेलें आहे त्या दैवाच्या किंवा नियतीच्या शिक्षकानें तसा चढाचा प्रसंग मला लागलीच आणिलाहि. अर्थात् मला उतरावें लागलें. वाघोबा आसपास कोठें दिसले नाहींत. पण दिसलेच तर आपल्याजवळ उपाय असा कांहीं नाहीं हें पाहून मला आमच्या इंग्रजसरकारचा मोठा राग आला. एवढ्या मोठ्या अफाट देशांतील कोट्यवधि प्रजाजनांजवळ एकसुद्धां हत्यार असूं द्यावयाचें नाहीं, हा काय चमत्कारिक प्रकार! यायोगें लोकांत धैर्य-शौर्य हीं कशीं उत्पन्न होणार? सर्व लोक 'मुकीं बिचारीं, कुणी हका' अशीं मेंढरें बनणार हें साहजिकच आहे. व मग हे त्या मेंढरांवर राज्य करणार! शांतता राखणार! मग यांत यांचा पराक्रम तो काय? व यांत यांना भूषण तरी काय? परंतु या इंग्रजांना तूर्त पराक्रमी म्हणवून घ्यावयाचें नाहीं, व एकाद्या भूषणावह दैवी गुणाचीहि त्यांना गरज नाहीं. त्यांना तूर्त आपला स्वार्थ साधावयाचा आहे. हिंदुस्तानचें राज्य त्यांना खुशाल झोंपेंत चालेल असें निष्कंटक बनवावयाचें आहे. तेव्हां ३० कोटी लोक हीं खरीं माणसें न राहतां मेंढरें झालेलीं त्यांना पाहिजे आहेत. आणखी कोणाचें मत कांहीं असो, मला तर असेंच वाटतें. असो. अशा प्रकारचे विचार करीत मीं तो **टायगरपाथ** सर्व संपविला. गाडी भुरंदिशीं सरकत चाललेली, वारा सुंदर, आणि दोहों अंगांस खूप दूरवर पसरलेलें तें वाघाचें अरण्य यांनीं माझी फार मौज झाली. पण स्वप्नाप्रमाणें अर्ध्या पाव तासांत तें सर्व दृश्य मागें पडून मी तेथून थेट एका पॉइंटवर येऊन पोंचलों याचें नांव **फॉकलंड पॉइंट**. बॉंबे पॉइंटच्या लगत **फॉकलंड व कॅर-नॉक** असे दोन लहानसे पाइंट आहेत. बॉंबे पॉइंट व हे दोन पाइंट यांवरून दिसणारें दऱ्यांचें व पर्वतराजीचें दृश्य फारसें वेगळें नाहीं. मी या तिन्ही पाइंट्सवर क्रमानें गेलों व तेथून खालीं पायवाटेनें उतरून-कोयनेचें तें दाट वृक्षराजीनें भरलेलें खोल खोरें एकहट्टीनें पाहण्यांत एक तास खर्च केलाच. हें सर्व दृश्य पाहतांच आनंदातिरेकानें वृत्ति उचंबळून येऊन मला कशाचा तरी

आल्यासारखें झालें! मीं इकडे तिकडे पाहावें, व मोठ्या आवेशांत कडे चालत जावें; मध्येंच थबकून दृष्टि अकस्मात् पुढील खोल दरींतून हेलकावे चमकत जाणारे जलौघावर स्थिर करावी; असें करीत करीत माझा तो तास कारोखरच ५ मिनिटांसारखा निघून गेला! सर्व पॉइंट्स एकाच दिवसांत पाहून मला परतावयाचें असल्यामुळें मोठ्या कष्टानें मला त्या स्थान-मित्रांचा निरोप घ्यावा लागला! परंतु शक्य असेल तर माझ्या वाचकमित्रांनीं एकेक पाइंट्ला एकेक दिवस काढून हा महाबळेश्वर पहावा असें मी त्यांस आग्रहपूर्वक सांगतों. मधून मधून त्या दरींतून एकादी घार एका वृक्षावरून निघून आकाशमार्गानें विहार करीत दुसऱ्या एकाद्या वृक्षावर—या पाइंटवरून त्या पाइंटवर—अशी जातांना दिसे. आणि लागलीच तिजविषयीं मनांत हेवा वाटूं लागे! त्या वेळीं मला वाटलें—आम्हां मनुष्यांना लाभली नाहीं अशी ही विधात्याची केवढी कृपा या प्राण्यांवर आहे बरें! आम्ही कितीहि मनांत आणिलें, तरी आम्हांस या पक्ष्याप्रमाणें गगनविहार करीत या सर्व दरीभर फिरण्याचें भाग्य लाभेल काय? पण अशा विचारानें एकीकडे खिन्न होत असतां, दुसऱ्यापक्षीं मी कल्पनासृष्टींत पंखें लावून सर्व दरी फिरून आलों असें मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. या वेळीं अमेरिकेंतील **नायगाराच्या** धबधब्यासंबंधीं एक गोष्ट ऐकलेली मला आठवली. तेथचा तो भव्य व गंभीर देखावा पाहून प्रेक्षकांच्या वृत्ति इतक्या उचंबळून येतात कीं, त्या सर्व जल-प्रदेशावर अंग टाकून खुशाल पुढें विहरत जावें असें त्यांस वाटतें! व त्या वृत्तीच्या भरांत कोणीं कोणीं तेथें प्रवेश करून त्या सुखाच्या मोहानें आपल्या इहलोकींच्या जीवितयात्रेची परिसमाप्तीसुद्धां केलेली आहे! वर्ष दोन वर्षांत असें एक तरी उदाहरण तेथें घडतें म्हणतात! घारीप्रमाणें पंख लावून सर्व दरीवरून गगनविहार करण्याची वृत्ति वरील वृत्तीशीं सजातीयच आहे. परंतु जीवितलोभानें म्हणा किंवा अन्य कारणानें म्हणा, माझी वृत्ति इतकी बेताल होण्यापूर्वींच माझी समाधि उतरली, व पुढचे पॉइंट्स पाहण्यासाठीं मीं आपला बचाव केला यांत संशय नाहीं.

याप्रमाणें हे तीन जवळजवळचे पॉइंट पाहून होतात तों ८॥ झाले. तसा मी परतलों व पुढचा **लाडविक पॉइंट** पाहण्यास जाण्यासाठीं, मालकमपेठेपासून १ मैलावर जेथें बॉम्बे व लाडविक या दोन्ही पॉइंटकडे जाण्यास दोन रस्ते फुट-तात तेथें आलों. हा पॉइंट येथून दोन मैल व मा० पेठेपासून अर्थात् ३ मैल

आहे. सर्व रस्ता अगदीं खूप उताराचा आहे. गाडीस वेग बेसुमार व थोडी दृष्टि चळली तर गाडी आपणांस केव्हांच रसातळास नेऊन [illegible] अशी सारखी भीति वाटे! दुतर्फा झाडी खूपच आहे! पण [illegible] रस्ता बराच आच्छादिलेला असल्यामुळें वेळ दुपारची असूनही असें [illegible]टे कीं, नुकताच सूर्य उदयास येत असावा. अशा त्या रस्त्यानें ५।१० मिनिटांतच मी लाडविक पॉइंटवर येऊन पोंचलों. पॉइंटवर एक मोठा चौथरा बांधलेला दिसला. तो कोणाचा काय, वगैरे शोधण्याच्या भरीस मी पडलों नाहीं. तेथून उजवे हातास जो एक लहान रस्ता लागतो त्यानें मी गाडीवरूनच पुढें चाललों. पॉइंटवरून सर्व देखावा पूर्णपणें पाहावयाचा असेल तर या चौथऱ्यापासून पुढें चांगलें अर्धा मैल जावें लागतें. तितकें गेल्यावर डोंगराची एक मोठी सोंड आहे, तीवरून थोडें पायीं चालत मी अगदीं टोंकाला येऊन पोंचलों. ही सोंड शेवटास तर ८।१० हातच रुंद आहे. शेवटास असलेल्या एका शिलेवर येऊन, बसत बसतच मी खालीं डोकावूं लागलों. त्या वेळीं जो भव्य देखावा माझ्या दृष्टीसमोर उभा राहिला तो वर्णन करणेंच अशक्य आहे! पायाखालीं असलेली सोंड चांगली २ हजार फूट खोलपर्यंत अगदीं सरळ उभी असलेली दिसत होती, डावे हातास **कोयनेचें खोरें** व उजवे हातास **सावित्रीचें खोरें** अपरंपार खोल पसरलें होतें. दोहों आंगांस उगम पावलेल्या त्या दोन्ही नद्यांचे ते प्रवाह दरींमधील अथांग झाडींतून प्रथम कोरडेच बाहेर पडलेले व लवकरच झिरपून येणाऱ्या लहान लहान पाझरांच्या योगें जलरूप झालेले व सारखे चमकत चमकत वळणावळणांनीं चाललेले पाहून दृष्टि अगदीं वेडावून जात होती. ७।८ मैलपर्यंत तर ते प्रवाह नयनगोचर होत होतेच. त्यापुढें लहानमोठ्या पर्वतांची सेना अगदीं क्षितिजापर्यंत दाटीनें पहुडली होती. तींत या दोन्ही नद्या कोणीकडे व कसकशा वाहात गेल्या आहेत हें अगदीं कळून येत नव्हतें. परंतु ते क्षितिजापर्यंत अस्ताव्यस्त पसरलेले डोंगर, कोणी बसलेले, कोणी उभे, कोणी दुसऱ्यावर रेललेले असून अगदीं उघडेबोडके निवांतपणें पहुडलेले पाहून मनास मोठा चमत्कार वाटत होता. **प्रतापगडचा सुळा** तर अगदीं समोरच उभा होता. जणुं तो व्यासपीठावर उभा राहून, आपल्या लगतच्या सर्व गिरिवरांना उद्देशून 'सूर्य उगवला! आतां असें आळशासारखें लोळावयाचें सोडून आपण कोण, आपलें कर्तव्य काय, याचा विचार करूं लागा' असें त्यांस सुंदर बोधामृत

हे. पण हिंदुस्थानच्या लोकांच्या आलस्याचेंच जणूं अनुसरण त्यांचे गिरिवर-बांधव जसे अस्ताव्यस्त पसरले होते, तसेच पसरून राहून, त्या तरुण पुढाऱ्याला हंसत खिदळत सांगत होते की–तूं जा आपलें कर्तव्य करावयाला! आम्ही असेच लोळणार! परंतु तो स्वाभिमानी शूर गडी शक्य तितका उंच होऊन, व श्रीशिवाजीमहाराजांचें स्मरण धरून हिंदुस्तानच्या भावी स्वराज्योदयाबद्दल आणि उत्कंठित मनानें, उपायचिंतनांत जणूं अगदीं निमग्न होऊन गेल्यासारखा दिसत होता. प्रतापगड पाहतांच शिवाजी महाराजांचें स्मरण होणें अपरिहार्यच होतें. ज्या पराक्रमी पुरुषानें व त्याचे संवगडी मावळे यांनीं असल्या परमदुर्गम दऱ्याखोऱ्यांत निवास करून शत्रूला कित्येक दिवस झुलविलें व ज्याला कौतुकानें मोगल लोक 'डोंगरांतील उंदीर' म्हणत त्याच्या व त्यांच्या पराक्रमाची योग्य कल्पना मनांत येऊन मन अगदीं स्तब्ध होऊन जाई! परमेश्वरा, तुझ्या गूढ स्वरूपाचा व अनंत लीलेचा पार आम्हां मानवांना लागणें अगदीं अशक्य आहे! हे दिव्य पराक्रमी लोक तूं कोठून कसे उत्पन्न केलेस! यापुढें तूं असे पुरुष केव्हां उत्पन्न करणार? आणि तुझ्या ह्या प्रिय आर्यावर्तास गत वैभवाचे दिवस तूं केव्हां दाखविणार? लीलानर्तका, तुझ्या या निःसीम अघटितघटनापटुत्वाला आमचें नमन असो! तूं ही अनंत-अपार सृष्टिरचना कशी आणि केव्हां केलीस? ही झाडी, या खोल दऱ्या, हीं विस्तृत खोरीं, आणि यापुढेंच ही पसरून राहिलेली अगणित गिरींची सेना यांच्यावर आमची दृष्टि ठरत नाहीं; आणि चित्त तर हजारों विचारलहरींनीं व्यापून गेलें आहे! अशा या वस्तू तूं केव्हां निर्माण केल्यास? तुझ्या पोटांत असलीं किती तरी दिव्य रत्नें आहेत कोण जाणे! ही सृष्टि जर आम्हांला इतकी गूढ झाली आहे, तर तिच्याहि पलीकडे तूं जे हे आणखी सूर्य, चंद्र, तारे इ. निर्माण केले आहेस, या तुझ्या लीलाचमत्कारांची आम्हांला काय कल्पना आहे? तुझ्या या सर्व वैभवाचा थांग लावण्यास मानवी बुद्धि म्हणजे काय पदार्थ आहे? अशा तुला विसरून आम्हीं आपल्या बुद्धीचा, पराक्रमाचा व वैभवाचा गर्व वहावा हें किती व्यर्थ आहे! हे जगन्नियंत्या! आम्हीं तुजपुढें सदैव नम्र असावें व तुला ध्यावें हेंच योग्य आहे!

वाचकहो, तुम्हांला थोडक्यांत येथील सर्व पॉइंट्सचें वर्णन सांगून मोकळें करावें असें म्हणत असतां माझी लेखणी अशी वाहवत चाललेली पाहून तुम्ही कदाचित् क्षुब्ध व्हाल! परंतु काय करावें? येथें हीं मनोहर व गूढ

सृष्टिचित्रें पाहतांना असा विचारांचा विविध प्रकारचा ओघ मनांत अ
येतो कीं, तो आंतलेआंत जिरवतांच येत नाहीं ! म्हणून तो ये...
कंठानें प्रगट केला आहे. एक देखावा विचारांची गर्दी उसळून देतो, तर दुसरा
देखावा चित्त अगदीं एकाग्र व समाधिनिष्ठ बनवितो. असें हें येथील दृश्य
तुम्हीं आयुष्यांत एकवार तरी पाहण्याचें विसरूं नका, असा मी तुम्हांला
आणखी एकदां आग्रह करितों !

याप्रमाणें हा **लाडविक पॉइंट** पाहून होत आहे तों १० वाजले. सूर्य
बराच वर आला. उन्हाचा ताप कांहीं जाणवला नाहीं, पण कांहीं अल्पाहार
करणें जरूर वाटूं लागलें. मग जवळचा डबा काढून थोडा फराळ केला आणि
पुढचा पॉइंट पाहण्यासाठीं परत मालकमपेठेस निघालों.

आतां पुढचें स्थान म्हणजे क्षेत्र **महाबळेश्वर.** मालकमपेठेपासून ४।५
मैलांवर उत्तरेकडे हें स्थान आहे. तेथें जाऊन पोंचण्यास मला १२ वाजले.
तेथें जाऊन पोंचतांच एक उपाध्याय सामोरे आले. त्यांचा आश्रय करून मी
मूळ **पंचगंगेच्या** देवालयांत गेलों. तेथें एका दगडी बांधीव भिंतीला जवळ
जवळ सारख्या अंतरावर भुईसरपट पांच कोनाडे केले आहेत. त्या पांच
नद्या होत. त्यांतून पाणी येत असतें. तें एकत्र करून गायमुखांतून एका
कुंडांत सोडलेलें आहे. तेथें यात्रेकरूंनीं स्नानें करावयाचीं. पाणी स्वच्छ होतेंच
आणि गारही होतेंच. या पांच नद्या म्हणजे कृष्णा, वेण्या, कोयना, सावित्री
व सरस्वती. पहिल्या तीन देशावर व पुढच्या दोन कोंकणांत वहात गेल्या
आहेत. या कुंडांत मीं स्नान केलें. उपाध्यायांच्या संतोषासाठीं त्यांस १ रुपाया
देऊन देवास अभिषेक व नैवेद्य करण्यास सांगितलें. उपाध्यायांनीं परत सत्का-
रार्थ मला एक पेलाभर चहा सिद्ध करून दिला आणि सरासरी २ वाजतात
तों **एलफिन्स्टन पॉइंटच्या** रस्त्याला लागून मीं आपली गाडी चालू केली !

# लफिन्स्टन् पॉइंट आणि आर्थर सीट.

क्षेत्रमहाबळेश्वरापासून पश्चिमेच्या बाजूला सुमारें ३ मैलांवर जो एक डोंगराचा फांटा पुढें आलेला आहे त्याला **एलफिन्स्टन पॉइंट** हें नांव दिलें आहे. जातांना वाटेंत चढउतार बरेच आहेत व दुतर्फा दाट झाडीहि आहेच, हेंहि सांगणें नको. ही झाडी फारशी उंच नाहीं खरी; परंतु अगदीं किर्र आहे. एकटा दुकटा मनुष्य, जवळ कांहीं हत्यार वगैरे न घेतां, सहसा या झाडींत शिरावयाचा नाहीं. अशा या झाडींतून सायकल चालवीत, व सुंदर गार वाऱ्याचें सुख घेत घेत मी १५।२० मिनिटांत त्या पॉइंटवर येऊन पोंचलों पॉइंटवर एक चौथरा उभा केलेला आहे, व प्रेक्षकांच्या साठीं कडेला एक वर्तुळाकार सपाट जागा तयार करून तेथें १।२ बांकेंहि ठेविलेलीं आहेत. परंतु खरा सृष्टिचमत्कार पहावयाचा तर येथून पाऊलवाटेनें आणखी पुढें जावें लागतें. त्याप्रमाणें गाडी बाकाशीं टेकवून ठेवून डावे हाताचे वाटेनें पुढें उतरत गेलों, तों सर्व झाडीच्या बाहेर, एका अगदीं निसरत्या टोंकावर येऊन पोंचलों. अगदीं टोंकावरच्या शिलेवर जाऊन बसावयाचें मनांत आलें. पण देहलोभ मोठा कठिण! ती शेवटची शिला अगदीं सुटली असली तर? पाय ठेवावयाचा अवकाश, कीं कपाळमोक्ष झालाच! अशा विचारानें मनांत धाकधुक करीत करीत मी मोठें धैर्य करून—माझ्या मतें धैर्य—त्या शिलेवर हळूहळू जाऊन बसलोंच! त्या वेळीं काय बहारीचा देखावा दिसला तो सांगतां येणें कठीण आहे! उजवे बाजूस अगदीं नीट उभा कडा! तो निदान २॥–३ हजार फूट असेल! त्यापुढें सावित्रीचें खोरें; आणि डावे बाजूस कोयना नदीचें खोरें; आणि इतकें सर्व पाहात बसावयाला बसणाराला लाभलेलें शिलासन फक्त एक हातभर, नव्हे अंग टेंकण्याइतकेंच! या सर्व स्थितीमुळें एकीकडे जीवाची भीति व दुसरीकडे सृष्टिदेवीचें गूढ, गंभीर व अत्यंत विस्तृत असें आल्हादकारक सौंदर्य यांनीं माझ्या मनाची मोठीच धांदल उडविली! पण त्या तशाही अवस्थेंत तेथें अर्धा तास बसल्याशिवाय मला राहवलें नाहीं. तो पुढचा दोहों अंगचा उतरत गेलेला विस्तृत प्रदेश हिरव्यागार झाडीनें आच्छादिला होता. तो पाहून, पंखें लावून त्यावर उडत विहरत जाऊन यावें असें फार वाटलें! पण काय? मनचे मांडे खाऊनच भूक भागवावी लागली. **सावित्रीच्या** व **कोयनेच्या** दोन्ही खोऱ्यांत, नदीच्या कांठीं शेतकरी

लोकांनीं मोठ्या कष्टानें लागवडीस आणलेलीं भाताचीं शेतें दिसून येत होतीं. आणि कोयनेच्या प्रवाहाचे दोन्ही अंगांस कांठाव होती तिच्या योगें एक मोठी सुंदर दुरेघी त्या खोऱ्यांतून निघून लांबवर पसरलेल्या त्या गिरिवरमंडलांत कोठें लपून जात होती त्याचा पत्ता लागत नव्हता. प्रतापगड हा शिवरायाचा दोस्त गडी तर पुढें उभा राहून, गत वैभवाचें स्मरण देण्याचें काम अविरत बजावीत होता. श्वापदांचे आवाज व झाडीचा किर्र शब्द हेही त्या प्रसंगाचें गांभीर्य अधिकाधिक हृदयभेदी करीत होते. असा तो परम अद्भुत देखावा पाहतांना माझ्या मनांत असा विचार आला कीं, ही केवढी विशाल सृष्टि आहे तरी ! किती तरी लांबवर पसरलेले हे डोंगर, यांचा पार दृष्टीला लागत नाहीं. त्यांच्यापलीकडे एक परम विस्तृत जलाशय–अरबी समुद्र पसरला आहे. त्याची लांबी केवढी व रुंदी केवढी ! तिलाही अंत नाहीं ! त्यावर हा अस्ताकडे झुकलेला दिनराज उभा आहे; हा नभोमंडळांत अखंड विराजमान झालेला जगद्दीप हा केवढा, कसा आहे हें मला काय कळत आहे ? मनुष्या ! काय तुझें ज्ञान, आणि काय तूं ! त्या परमेश्वराची–जगच्चालकाची थोरवी तुला नुसती कल्पनेंत सुद्धां आणतां येत नाहीं ! मग तिचें तूं वर्णन काय करणार ? आणि वर्णनच जर करतां येत नाहीं, तर त्याची तूं लेशमात्रानें तरी बरोबरी करण्याची हाव धरावी, हा किती खुळेपणा आहे ! लेंकरूं फार आनंदलें म्हणजे तें जसें धांवत जाऊन आईच्या कमरेस विळखा देतें, व मग ती आई त्यास हृदयाशीं घेते; व शेवटीं त्या दोघांचीं हृदयें एक होऊन जातात; त्याप्रमाणें मानवा ! तूं फक्त त्यास भेटून त्याच्याशीं मिळून जाण्याचाच अधिकारी आहेस; तेवढीच हाव तूं धरावीस ! तूं तो होशील हें कालत्रयीं शक्य नाहीं ! जीव तो जीव आणि शिव तो शिव !

श्रीमद् आद्य शंकराचार्यमहाराज ! मला क्षमा करा ! **जीवो ब्रह्मैव नापरः** हा आपला सिद्धांत आपण साक्षात् अनुभविला असेल; आणि त्याला कदाचित् गीता व दशोपनिषदें यांची संमतिहि असेल; परंतु या अजाण जीवाला हें सृष्टीचें नितांत रमणीय व परम गंभीर स्वरूप पाहून ज्या कल्पना आल्या, त्या मोकळेपणानें सहृदय वाचकांपुढें मांडण्याला तूर्त तरी परवानगी द्या ! या मनाच्या भावनाविलासांतून थोड्या वेळानें मी बाहेर पडल्यावर आपलें पद वंदन करून आपले सर्व सिद्धांत मी मान्य करीन. पण तूर्त मला एवढी परवानगी असूं द्या !

ल्फिन्स्टन पॉइंटची शोभा पहात याप्रकारें अर्धा तास घालविल्या-
ओढीमुळें **आर्थरसीट** अथवा **ब्रम्हारण्य** पाहण्यासाठीं मी
गाडी-आरूढ झालों, व त्या नांवाची पाटी लावलेल्या रस्त्याला
लागलों. एथून आर्थरसीट सुमारें २ मैलांवर आहे. आर्थरसीटच्या अलीकडे
॥ मैलावर एक लहानसें टोंक आहे त्यावर सावित्रीपॉइंट म्हणून एक पाटी
लाविलेली आहे. तेथूनही सावित्रीच्या खोऱ्याचा देखावा सुंदर दृष्टीस पडतो.
या भागांतील झाडी सर्वांपेक्षां विशेष दाट आहे; आणि ३।४ मैल लांब पस-
रलेली असून, मधून रस्तेही नसल्यामुळें साधारण लोकांचा येथें प्रवेश होत
नाहीं. या प्रदेशांत ऋषींचें एक प्राक्कालीन होमकुंड आहे, व त्या जागीं थोडें
उकरलें असतां अद्याप भस्मही आढळून येतें असें सांगतात, परंतु ती पाऊलवाट
दाखविण्याला मजबरोबर कोणी नसलेमुळें झाडींत खोल शिरण्याचें तें एक
चांगलें निमित्त असूनही मला तें लाभलें नाहीं. परंतु दोघे चौघे स्नेही असावे;
हातीं बंदुक नको, पण भाले असावे; निदान काठ्या असाव्या; आणि मन-
मुराद या ब्रह्मारण्यांत, नानाप्रकारच्या तत्त्वविचाराच्या गोष्टी बोलत खुशाल
सबंध दिवस घालवावा असें मनास फार वाटलें! व अझूनही ती वृत्ति शमन
झाली नाहीं. परंतु काय करणार? प्रयत्नवादी बुद्धिहि अशा वेळीं कालाकडे
दृष्टि देऊन स्वस्थ राहते, यांत संशय नाहीं.

असो. आर्थरसीटवर जातांच दरएक पॉइंटप्रमाणें येथेंही गाडी अलीकडे
ठेवून पुढें ५।५० पावलें जावें लागलें. जवळच लोखंडी गज उभे करून ४।२
प्रेक्षकांना उभें राहून पाहण्याएवढी जागा केलेली आहे. परंतु पाऊलवाट तेथें
न संपतां तशीच पुढें जाते. तिजमुळें उत्कंठा वाढून मी पुढें चाललों. वाट
फक्त एक फूट रुंदीची, आणि एका अंगाला तर सावित्रीनें उडी घेतलेला
प्रचंड कडा, यामुळें येथून जातांना भीतभीत जावें लागलें. थोड्याच अंतरावर
खालच्या अंगाला डोंगराच्या अगदीं खबदाडांत एक लहानसें हातभर लांब-
रुंद असें टांकें बांधलेलें आहे. त्यांत कड्यावरून झुळझुळ वाहणारा एक झरा
आहे. त्या कड्याला भांडें लावून, मी पाणी भरून घेतलें आणि थोडें सेवनही
केलें. फार मधुर. पण तृष्णेच्या अभावीं त्याचा मला फारसा उपयोग झाला
नाहीं. पदार्थ उत्तम असला तरी गरजेशिवाय त्यास मोल नाहीं. अर्थात् इच्छा
नाहीं, तर पदार्थोपभोगाचें खरें सुख नाहीं. वेदान्तांत सांगितलेलें इच्छेवांचून
जें स्वयमेव अनुभवण्याचें सुख, त्या संबंधांत तूर्त बोलणें नको; परंतु व्यवहा-

रांत तर पदार्थ स्वयमेव चांगले किंवा वाईट, सुखद किंवा दुःखद नाहींत; तर जसा त्यास भोक्ता भेटेल, तदनुसार त्यांस चांगलें वाईट सुखदुःखादि धर्म येतात. अर्थात् चांगलेवाईटपणा किंवा सुखदुःखें सर्व मनाचे आहेत, सृष्टीचे नाहींत. सृष्ट पदार्थ चांगलेही नाहींत आणि वाईटही नाहींत. तर मग हे मूढ मना! तूं अशा सृष्टीला वाईट समजून उगीच दुःखभाक् कां होतेंस? भावनेच्यात्र बळानें सृष्टीचा स्वर्ग करून आनंदी-आनंद कां करून घेत नाहींस? पण जा! हे क्षुद्रा! तुझ्या नादीं लागण्याचें सोडून आत्मस्वरूपींच विश्रांतीस जाणें हें फार बरें!

त्या टांक्यांतून भरून घेतलेल्या एवढ्याशा जलानें तहानेचें मधुर सुख देण्याचें आपलें पहिलें कर्तव्य सोडून, असला वेदान्तविचार आम्हांला शिकविण्याचा अव्यापारेषु व्यापार केला! तेव्हां ज्यांची न्यायदृष्टि विशेष तीक्ष्ण आहे त्या वाचकांनीं त्याकडे लक्ष नाहीं दिलें तरी चालेल. अथवा ‘ परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती ’ या मयूरोक्तीप्रमाणें प्रभुत्वाचा मान घेण्याची तयारी असणाऱ्या सज्जनांनीं तूर्त या तत्त्वविचाराच्या पाहुण्याला क्षणभर पडून राहण्यापुरती मनाच्या एका कोपऱ्यांत जागा द्यावी, आणि महाबळेश्वरवर्णनाच्या प्रस्तुत विषयाकडे आतां अवधान द्यावें.

एल्फिन्स्टन पॉइंटवरून सावित्रीच्या खोऱ्याचा जो देखावा दिसतो तोच येथून दिसतो; पण जरा सूक्ष्म आणि विस्तृत दिसतो. येथून जवळच दुसरी एक पाहण्याची जागा आहे. टांक्यापाशीं उभें राहिलें असतां उत्तर अंगाला थोड्याच अंतरावर एक डोंगराचा भाग थोडा पुढें आलेला आहे. त्यावर गज मारलेले दिसतात. जरा सूक्ष्म दृष्टीनें पहावें म्हणजे दिसतें. तिकडे जाण्याची पाऊलवाट या टांक्याजवळच उजवे हातास दिसते. तिनें एक फर्लांगभर तरी जावयाचें असतें. ही पाऊलवाट म्हणजे ब्रह्मारण्यांतली वाट होय. त्यामुळें एकट्यानें जाणें फार जिवावर येतें. यामुळेंच एक फर्लांगभर वाटेवर, परतून चार वेळ जावें अशी कल्पना मला आली! पण कसा तरी दबकत दबकत, व पुनः धैर्य धरीत मी त्या गजाच्या जागेपर्यंत आलों. आतां येथें सावित्रीचें खोरें डावे हातास आलें व उजवे हातास कृष्णेच्या खोऱ्याचा अगदीं आरंभींचा भाग दिसूं लागला! पण त्या एक हातभर जागेंत त्या गजाला धरून उभें राहण्याकडे पुष्कळ लक्ष वेधून गेलें होतें. आणि समोरचा किंवा पायां-

ळाभोर कडा पाहण्याकडे डोळे ओढ घेत होते. एवढा-
मधून मधून अगदीं उभा कडा मीं अन्यत्र अद्याप कोठें पाहिला नाहीं.
... र जी.झा लांबीचा असेल व उंच १ हजार फूट तरी असावा. एवढा उंच कडा, वेळोशीं घनदाट झाडींतून लहानसाच बाहेर पडणारा सावित्रीचा प्रवाह यांकडे सारखें किती वेळ तरी मी पाहात राहिलों. देहभान विसरत होतें असें म्हटलें तरी त्यांत अत्युक्ति अगदीं नाहीं. पण मध्येंच समाधि उतरून हाताशीं असलेल्या गजांकडे डोळे लागले कीं, पुनः धाक वाटे! कडेलोट झाला तर काय होईल हा प्रश्न! पण काय होणार होतें? पहिल्याच क्षणीं मूर्च्छा आली म्हणजे पुढचा सर्व वादविषय संपलाच! आणि मराठ्यांच्या अमदानींत व मोंगलाईंत असे थोड्यांचे का कडेलोट झाले! त्यांचें काय झालें? त्यांनीं ते हाल सोसलेच कीं नाहीं? मग त्यांच्या गोष्टी वाचणाऱ्या आम्हांसच याचें एवढें भय कां! पण वादविवादाचा उपयोग नाहीं. गजांकडे व पायांखालच्या शिळेकडे लक्ष गेलें कीं एकदम मनांत धस्स होई हें खरें!

देवी सावित्री, तूं येथून एकदम उडी घेतलीस, त्या तुझी धन्य आहे! तुला यज्ञाला येण्यास उशीर झाला, इतक्यांत ब्रह्मदेवांनीं दुसरीच स्त्री बनवून यज्ञास आरंभ केला, म्हणून तूं रागावलीस, आणि येथून उडी टाकून एकदम निघून गेलीस! ही तुजविषयींची पौराण कथा लोक सांगतात; आणि प्रवाहरूपानें तर तूं उडी घेतांना पर्जन्यकाळीं तर आम्ही साक्षात् पाहतों. हें तुझें धैर्य ध्यानांत येतांच आम्हांस अतिशय आश्चर्य वाटतें. परंतु हे जलदेवतांनो! तुमचे हें अतुल लीलाचरित्रच आमच्या अत्यंत उपयोगास आलें आहे. देवी कृष्णे! वेण्ये! कोयने! सावित्री! सरस्वती! तुम्ही जर अशा उड्या घेतल्या नसत्या तर महाराष्ट्रास अन्न व पाणी कोणीं पुरविलें असतें? या देशाचें जीवन तुम्हीच; तुम्हीच पांचजणी या देशाचें लालनपालन करणाऱ्या माता आहांत! तर तुमच्या या प्रिय देशाला तुमचा प्रेमाचा आशीर्वाद असूं द्या, म्हणजे तो आपलें पूर्ववैभव लौकरच प्राप्त करून घेईल. आणि प्रिय महाराष्ट्रा! तूंही येथें येऊन या पंचनद्यांच्या, पंच मातृदेवतांच्या चरणीं आपला माथा लववून पावन कर आणि मातेचा प्रेमाचा आशीर्वाद जोड! नाहीं तर तुझ्या भाग्योदयाला या मातृदेवींपेक्षां अधिक कळकळीनें दुसरा कोण साह्य होणार आहे बरें?

उजवे हाताचें कृष्णेचें खोरें तर एकपरीनें सावित्रीच्या खोऱ्यापेक्षांही मनोहर व भव्य आहे. सावित्रीचें खोरें तर अतिशय खोल आहे. पण हें खोरें

अतिशय विस्तृत आहे. याच खोऱ्यांत कोंकण आणि देश यांची पाहावयास मिळते. कोंकणांतील प्रदेश सर्व उघडा आहे, व देशाचे उगमाच्या अगदीं आरंभापासून हिरवीगार झाडी लागलेली आहे. वस्तीपासून अतिशय दूरवर असलेला हिरवळीचा सुंदर प्रदेश पाहून मला अशी कल्पना आली कीं, अशा ठिकाणीं गुरुकुलासारखें एक सुंदर विद्यालय असावें. म्हणजे काय मौज होईल ! तेथें तयार होणारे विद्यार्थी म्हणजे पूर्व-कालीन ऋषीसारखे होतील ! थोर विचार, उदात्त नीतितत्त्वें, परम गूढ असे तत्त्वानुभव यांची समृद्धि येथें राहणाऱ्यांच्या चित्तांत, न सांगतां व न शिकवितां व्हावी ! अशी निसर्गसंपत्ति अन्यत्र कोठें मिळेल ? पण असल्या सुंदर निसर्गसंपत्तीचें सुख व लाभ आमच्या तरुण नव्या पिढीस कसा होणार ? कोण करून देणार ? असें विद्यालय निघून नंतर विद्यार्थिजनांना तेथें निवास-सुख घेतां येईल, हें जरी थोडें दुर्घटित असलें, तरी येथें येऊन हें सर्व दृश्य एकवार पाहून घेण्याचें भाग्य तरी सर्वांना शक्य आहे. यासाठीं माझ्या वाचकमित्रांनो ! येथें एकवार येऊन हें सर्व सह्याद्रिशिखर तुम्ही एकवार पहाच पहा ! अगदीं आळस करूं नका !

असो; आतां हें प्रवासवर्णन संपलें. क्षेत्रमहाबळेश्वरापासून पूर्वांगाला **वेंव्हगंगा पाइंट** म्हणून एक ठिकाण आहे तेंही कृष्णेचें खोरें पूर्णपणें पाहण्यास फार सोईचें आहे. किंबहुना कृष्णा खोरें येथूनच समग्र दृष्टीस पडतें. येथें येण्याची पाऊलवाट म्हणजे **जोरखेड्याचीच** वाट होय. त्या वाटेनें अर्धा पाऊण मैल गेल्यानें हें ठिकाण येतें. येथें बांकें वगैरे कांहीं नाहींत. तरी हें ठिकाण अतिशय रमणीय आहे यांत शंका नाहीं. पश्चिम आंगचा गार वाऱ्याचा सारखा प्रवाह या ठिकाणावरून जात असल्यानें भर दोन प्रहरींही येथें खुशाल अगदीं उघड्यावर, हवा घेत राहतां येतें. उन्हाचा ताप तिळमात्र भासत नाहीं. उन्हाळ्याचे दिवसांत भर दुपारीं इतका गार सुंदर वारा दुसऱ्या कोठेंच कधीं अनुभवास येण्याचा संभव नाहीं. या दृष्टीनें हें ठिकाण फारच आल्हादकारक आहे खास. असो. कृष्णेचा मुख्य उगम म्हणून सांगतात तें कृष्णेचें मंदिर याचेचजवळ आहे. त्याला वेगळा लहानसा रस्ता असून त्यावर **कृष्णा पॉइंट** म्हणून पाटी लावलेली आहे. पाहावयास येणारांनीं याही स्थळासाठीं एक अर्धा तास काढल्याशिवाय राहूं नये, अशी विनंति आहे. इति अलम्.

REFBK-0002416

REFBK-0002416